सोमवार, २७ जून २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३४०
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

तुम्हाला हिशोब तर द्यावाच लागेल -किरीट सोमय्या/२
सहा कोटींची व्हेल माशाची उलटी जप्त/७
बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धेत सुयश, ज्ञानदा अजिंक्य/८

### पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मानले जनतेचे आभार



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी (दि. २६) रेडिओच्या माध्यमातून देशातील जनतेला 'मन की बात'व्दारे संबोधित केले. मन की बातचा हा ९०वा भाग होता. मोदी म्हणाले, या कार्यक्रमात आपण सर्वजण एकमेकांच्या प्रेरणादायी प्रयत्नांवर चर्चा करण्याचा प्रयत्न करू, 'मन की बात'साठी मला तुम्हा सर्वांकडून अनेक पत्रे मिळाली आहेत, यासाठी मी तुमचा खूप आभारी आहे. नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया युथ गेम्समध्येही आमच्या खेळाडूंनी अनेक विक्रम केले. या खेळांमध्ये एकूण १२ विक्रम मोडले गेले आहेत. इतकेच नाही, तर महिला खेळाडूंच्या नावावर ११ विक्रम नोंदवले गेले आहेत. नीरजनं तर फिनलंडमध्ये रौप्यपदक जिंकून स्वत:चाच विक्रम मोडलाय. जेव्हा देशातील तरुण आकाशाला भिडायला तयार आहेत, तेव्हा आपला देश मागे कसा राहणार, असेही मोदी म्हणाले.

# शिंदे समर्थक आमदारांना केंद्राची विशेष सुरक्षा

## राज्यात कार्यालयांमध्ये तोडफोड झाल्याने निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्यासोबत बंडखोरी करून गुवाहाटीमध्ये थांबलेल्या शिवसेना आमदारांना आता केंद्र सरकारने विशेष वाय प्लस सुरक्षा पुरवण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

एएनआयने सुत्रांनी हे वृत्त दिले आहे. गेल्या दोन दिवसांमध्ये गुवाहाटीमध्ये थांबलेल्या शिवसेना आमदारांपैकी काहींच्या कार्यालयांमध्ये तोडफोड झाल्याच्या घटना घडल्या. त्यामुळे या आमदारांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याचे बोलले जात होते. या पार्श्वभूमीवर या बंडखोर आमदारांपैकी जवळपास १५ आमदारांना केंद्र सरकारने वाय प्लस दर्जाची सुरक्षा देण्याचा निर्णय घेतला आहे.



शिवसेनेने भाजपसोबत हातमिळवणी करून नैसर्गिक युती करावी आणि राज्यात सत्ता स्थापन करावी, अशी अट बंडखोर आमदारांच्या गटाकडून घालण्यात आली आहे. गुवाहाटीमध्ये थांबलेल्या शिवसेना आमदारांपैकी काहींच्या कार्यालयांमध्ये तोडफोड करण्यात आली होती. आमदारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे.

### 'मविआ' सरकार संभ्रमातच

**मुंबई :** शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यामुळे महाविकास आघाडीचे सरकार धोक्यात आले आहे. उद्धव ठाकरे व बंडखोर नेते एकनाथ दोघेही बहुमत सिद्ध करण्याबाबत बोलत आहेत. यामुळे 'मविआ'चे घटकपक्ष राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. सरकार पडणार या भीतीने बैठकांना ऊत आला असून जीआर काढले जात आहेत. त्यामुळे सध्या हे दोन्ही पक्ष राजकीय संभ्रमात अडकले आहेत.

### शिंदेंच्या समर्थनार्थ पहिला राजीनामा

**ठाणे :** मंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्याच पक्षाविरोधात दंड थोपटले आहेत. शिंदे यांच्या या भूमिकेचे अनेक शिवसैनिकांकडून समर्थन करण्यात येत आहे. या सर्व घडामोडी घडत असताना आता एकनाथ शिंदे यांच्या समर्थनार्थ शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के यांनी राजीनामा देणार असल्याचे जाहीर केले आहे. मागील अडीच वर्षापासून राष्ट्रवादी पक्षाकडून गळचेपी चालली आहे. त्याचा निषेध म्हणून राजीनामा देत आहे, असे म्हस्के यांनी ट्विटमध्ये जाहीर केले आहे.

### शिवसेनेचे मंत्री उदय सामंतही शिंदे गटात



**मुंबई :** शिवसेनेचे जवळपास ४० आमदार सध्या एकनाथ शिंदे यांच्यासोबत गुवाहाटीमध्ये आहेत. आमदारांच्या बंडामुळे ठाकरे सरकार धोक्यात आहे. अशात सरकार वाचवण्यासाठी पूर्ण प्रयत्न केले जात आहे, मात्र आता ठाकरे सरकारला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. आता उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत हेदेखील सुरतहून विशेष विमानाने गुवाहाटीला दाखल झाले आहेत. त्यांचे एकनाथ शिंदे यांनी स्वागत केले. हा उद्धव ठाकरेंसाठी मोठा धक्का असणार आहे. उदय सामंत उद्धव ठाकरेंचे निकटवर्तीय होते. त्यामुळे त्यांचे शिंदे गटात सामील होणे, शिवसेनेसाठी नक्कीच अनपेक्षित होते.

### राज्यपालांचे पोलीस आयुक्तांना पत्र

**मुंबई :** राज्यपालांनी मुंबई पोलीस आयुक्त पांडे यांना पत्र लिहिले आहे. शिंदे गटातील आमदारांना सुरक्षा देण्याची मागणी या पत्रातून केली आहे, तसेच याची एक प्रत राज्याचे पोलीस महासंचालक यांनाही लिहिली आहे. त्यामुळे आता राज्यपाल हे आता सक्रिय झाले आहे. एकनाथ शिंदे यांच्या गटाने राज्यपाल यांना सुरक्षेबाबत पत्र लिहून मागणी केली होती. त्यानंतर राज्यपालांनी हे पत्र पाठवले आहे.

### विलिनीकरणाचा विचार त्यांनी करावा -केसरकर

**गुवाहाटी :** शिवसेनेने बंडखोर आमदारांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. घाण गेली म्हणत नव्याने पक्ष उभा करण्याचा सल्ला उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी शिवसैनिकांना दिला आहे. असे असताना बंडखोर आमदारांचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी, जी शिवसेना आहे ती आम्हीच आहोत. कशात विलीन व्हायचे ते त्यांनी ठरवावे, असा सल्ला उद्धव ठाकरे आणि त्यांच्यासोबत असलेल्या आमदारांना दिला आहे.



## सिडकोच्या ढिसाळ नियोजनामुळे करंजाडेमध्ये पाणीसंकट

### भाजप जिल्हा सरचिटणीसांचे आमदार प्रशांत ठाकूर यांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या अनेक दिवसांपासून सिडकोने वसविलेल्या विविध वसाहतींमध्ये पाण्याचा प्रश्न उद्भवला असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. करंजाडे वसाहतीमध्ये ७ जूनपासून जवळपास ५० टक्के पाणीकपात करण्यात आली आहे. याबाबत भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी रविवारी (दि. २६) सकाळी आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

सिडकोच्या करंजाडे वसाहतीमध्ये ७ जूनपासून जवळपास ५० टक्के पाणीकपात करण्यात आली असून १५ एमएलडीवरून सद्य स्थितीत ७-८ एमएलडी सरासरी पाणीपुरवठा होत असल्याचे सरचिटणीस विनोद साबळे यांनी सांगितले. पाणीकपातीमुळे नागरिकांची विशेषतः महिला वर्गाची मोठी अडचण होत आहे. त्यामुळे या प्रश्नी आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्ष घालून समस्या सोडविण्याची मागणी या वेळी करण्यात आली.

**वरिष्ठ अधिकार्‍यांसोबत बैठक घेणार -आमदार प्रशांत ठाकूर**

**या प्रश्नावर सविस्तर चर्चेसाठी सोमवारी (दि. २७) दुपारनंतर सिडको बेलापूर येथे वरिष्ठ अधिकार्‍यांसोबत बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत पनवेल परिसरातील सिडकोच्या वसाहतींमध्ये निर्माण झालेल्या पाणी प्रश्नाबाबत सविस्तर चर्चा करून त्वरीत तोडगा काढण्याबाबत सांगणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी सांगितले.**

या वेळी भाजप शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे, युवा नेते अतिष साबळे, शहर उपाध्यक्ष सतिष पिंगळे, दिनेश धामनस्कर, प्रल्हाद कुंभार, पराग बने, पांडुरंग कांबळे, जयवंत भुजबळ, वैभव बांदे, वैभव सपकाळ, सुनील गुंड, वैभव गुरसळे व रहिवासी उपस्थित होते.

## निवडक

### पंतप्रधान नरेंद्र मोदी जर्मनी, यूएई दौर्‍यावर

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या जर्मनी आणि संयुक्त अरब अमिरातीच्या दौर्‍यावर आहेत. जर्मनीमधील जी-७ शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. पंतप्रधान मोदींच्या स्वागतासाठी जर्मनीचे चान्सलर ओलाफ स्कोल्स यांच्यासह पदाधिकारी विमानतळावर उपस्थित होते. परिषदेत पर्यावरण, ऊर्जा, हवामान, अन्नसुरक्षा, आरोग्य, लैंगिक समानता आणि लोकशाही या मुद्यांवर आंतरराष्ट्रीय सहकार्य मजबूत करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून इतर लोकशाही देशांनाही आमंत्रित करण्यात आले आहे.

### लोकसभा पोटनिवडणुकीत भाजप उमेदवाराचा विजय

**रामपूर :** रामपूर लोकसभा पोटनिवडणुकीत भाजपने समाजवादी पक्षाला मोठा धक्का देत घनश्याम सिंह लोधी यांनी असीम रझा यांचा ४२,०४८ मतांनी पराभव केला. मतमोजणीनंतर असीम खान सुरुवातीला आघाडीवर होते, पण नंतर त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.



## खारघरच्या उद्यानातील कामांचे महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील सिडको वसाहतीमध्ये सिडकोने उद्याने उभारली, मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्याने त्यांची दुर्दशा झाली आहे. सिडकोमार्फत महापालिकेकडे उद्याने हस्तांतरित केल्यानंतर या उद्यानांमध्ये विविध सुविधा उपलब्ध करण्याकरिता भाजपच्या महापालिकेचे स्थायी समिती सभापती अ‍ॅड. नरेश ठाकूर, महिला बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, शत्रुघ्न काकडे यांनी पाठपुरावा केला होता.

त्याअंतर्गत रविवारी (दि. २६) खारघर सेक्टर ७ प्लॉट नंबर २० येथील खेळाचे मैदान, ओपन जिम, वाचनालय, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय व उद्यानातील कामाचे भूमिपूजन महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. **(पान २ वर...)**

> **सिडकोने केवळ उद्याने बांधली आहेत, मात्र त्या उद्यानांमध्ये कामे करण्यासाठी भाजपच्या सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या सहकार्याने नक्कीच पुढील काळात खारघर हे आदर्श शहर आम्ही बनवणार आहोत.**
> **-परेश ठाकूर, सभागृह नेते, पनवेल मनपा**

### गुवाहाटीत आमदाराचा वाढदिवस उत्साहात

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

राज्यात एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर राज्यातील राजकारण तापले आहे. या राजकीय गोंधळात बंडखोर आमदारांनी एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत भंडार्‍याचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांचा वाढदिवस साजरा केल्याचा व्हिडिओ समोर आला आहे.

भंडार्‍याचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांचा वाढदिवस गुवाहाटी येथील रॅडिसन ब्लू हॉटेलमध्ये शिवसेना बंडखोर नेते एकनाथ शिंदे आणि इतर आमदारांच्या उपस्थितीत हा वाढदिवस साजरा करण्यात आला. या व्हिडिओमध्ये सर्व आमदार दिसत आहेत. नरेंद्र भोंडेकर हे अपक्ष आमदार आहेत, मात्र ते शिवसेना समर्थित आमदार म्हणूनच ओळखले जातात. बंडखोरीनंतर आमदार भोंडेकर शिंदे गटात गेले आहेत.

## आम्ही राज्यात दोन-तीन दिवसच विरोधी पक्षात

### केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवेंचे सूचक वक्तव्य

**जालना : प्रतिनिधी**



केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी राज्यात पुन्हा भाजपची सत्ता येणार असल्याचे संकेत दिले आहेत.

रविवारी (दि. २६) केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे आणि आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या उपस्थितीत जालना शहरात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या कार्यालयाचं भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी आयोजित कार्यक्रमात दानवे यांनी टोपे यांना उद्देशून जालना जिल्ह्यात जे काम करायचे असेल ते लवकर करा, राज्य सरकारचे थोडे दिवस उरले असून मी फक्त दोन ते तीन दिवस विरोधी पक्षात आहे, असे वक्तव्य रावसाहेब दानवे यांनी केले.

राज्यात राष्ट्रपती राजवट लागण्याची शक्यतादेखील दानवे यांनी फेटाळून लावली, तसेच शिंदे गटाशी युती करायची की, नाही याबाबत भाजपचे राज्यातील नेते निर्णय घेतील असेही त्यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांची गुजरातमध्ये भेट झालेली नाही. आमच्या पक्षाच्या बैठका जरी सुरू असल्या तरी राज्यातील परिस्थितीवर आम्ही लक्ष ठेऊन आहोत, असेही दानवे यांनी या वेळी नमूद केले.

## कर्मयोगी नमो लघुपट स्पर्धेत पनवेलला तीन पारितोषिके





**पुणे : प्रतिनिधी**

भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठच्या वतीने आयोजित कर्मयोगी नमो लघुपट स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवारी (दि. २६) कोथरुडमधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात झाला. या स्पर्धेत पनवेल तालुक्यातील तीन संस्थांच्या लघुपटांना पारितोषिक मिळाले आहे.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेशच्यावतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीवर 'कर्मयोगी नमो' लघुपट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. देशभरातून एकूण १३५ स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेत, एक ते १२ मिनिटांचे लघुपट सादर केले होते. यापैकी काही निवडक लघुपट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: पाहून विशेष पसंती दर्शविली होती.

या स्पर्धेत पनवेलमधील सत्यधर्म प्रोडक्शनच्या सेल्फी पॉइंट या लघुपटाला द्वितीय क्रमांक ५१,००० रु. व स्मृतिचिन्ह, अनन्या एजन्सीच्या सक्षम या लघुपटाला उत्तेजनार्थ ५,००० रु. व स्मृतिचिन्ह व स्वर्णीम संस्थेच्या स्वच्छ सर्वेक्षण भारत या लघुपटाला उत्तेजनार्थ ५,००० रु. व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. **(पान २ वर...)**





**पुणे : राजर्षी श्री शाहू प्रतिष्ठान संचलित चाकण येथील ग्लॅडिओलस इंग्लिश मीडियम स्कूल येथे शाहू महाराज जयंती व संस्थेचा वर्धापन दिन रविवारी साजरा झाला. या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी 'रयत'चे व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे, पश्चिम विभागीय चेअरमन आमदार अ‍ॅड. राम कांडगे, राजर्षी श्री शाहू प्रतिष्ठानचे अध्यक्ष अ‍ॅड. राजेश कांडगे, उपाध्यक्ष विष्णू कड, सचिव अ‍ॅड. निलेश जाधव, प्राचार्य जेम्स जोसेफ आदी मान्यवर उपस्थित होते.** **(वृत्त पान २ वर...)**

# सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून पनवेलमधील विविध कामांची पाहणी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि पनवेल महापालिकेचे नगरसेवक यांच्या सातत्यापुर्ण प्रयत्नांमुळे व केलेल्या पाठपुराव्यामुळे अनेक विकासाची कामे महापालिका क्षेत्रात होत आहेत. त्या अनुषंगाने पनवेल महापालिकेमार्फत मान्सूनपूर्व कामे वेगाने सुरू आहेत. यामधील काही कामे पूर्ण झाली असून काही कामे अंतिम टप्प्यात आहेत. अशी कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासंदर्भात महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सुचना केल्या आहेत.





पनवेल महापालिका हद्दीतील मान्सूनपूर्व कामांची पाहणी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी (दि. २५) केली. गावदेवी मंदिर, कन्या शाळा, टपाल नाका, मार्केट यार्ड जवळील मैदान या भागातील नाले सफाई, रस्ते आणि गटारांची, लोकनेते दि. बा. पाटील शाळा बांधकाम, कल्पतरू सोसायटीनजीकचे राजीव गांधी उद्यान सुशोभिकरण अशा विविध ठिकाणांच्या कामांचा पाहणी दौरा करण्यात आला. या वेळी संबंधित अधिकार्‍यांना कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देत परेश ठाकूर यांनी कामांमधील अडचणी जाणून घेतल्या.

या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर म्हणाले की, कल्पतरूनजीकच्या राजीव गांधी उद्यानामध्ये मोठी दुरवस्था झाली होती. परिसरातील नागरिकांनी व या उद्यानामध्ये येणार्‍या नागरिकांनी माझ्याकडे या उद्यानाची डागडुजी करण्यासंदर्भात मागणी केली होती. त्यानुसार उद्यानातील शौचालय, खेळणी यासह विविध साहित्यांची डागडुजी पनवेल महापालिकेतर्फे करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत. लोकनेते दि. बा. पाटील शाळेचे बांधकामही आता अंतिम टप्प्यात आले आहे. बांधकामांतील किरकोळ कामेदेखील दोन-चार दिवसांत होणार असल्याचे कंत्राटदारांकडून समजले असल्याने या शाळेचा नामकरण सोहळा लवकरच करण्यात येणार आहे.

पाहणीच्या वेळी नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, प्रभाग क्रमांक १८ विभागीय अध्यक्ष पवन सोनी, सपना पाटील, कार्यकारी अभियंता संजय कटेकर आदी उपस्थित होते.

# ज्येष्ठ नागरिकांची परवड

## एसटी प्रवासातील सवलत मिळणे अवघड

**पनवेल : प्रतिनिधी**

आधारकार्ड हा अधिकृत वयाचा पुरावा एसटीला मान्य नसल्याने आणि ट्रायमॅक्स कंपनीच्या ढिसाळ कारभारामुळे ज्येष्ठ नागरिकांना एकादशीला पंढरपूरला जाण्यासाठी आणि गणेशोत्सवाला कोकणात जाताना एसटीमध्ये सवलत मिळणे अवघड होणार आहे. अनेक ज्येष्ठ नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

ज्येष्ठ नागरिकांना एसटीमध्ये सवलतीसाठी १ जुलैपासून स्मार्ट कार्ड आवश्यक केले आहे. याशिवाय या कार्डाचे दर वर्षी नूतनीकरण करावयाचे आहे, पण हे कार्ड मिळण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि एसटी कर्मचार्‍यांचे वाद होत आहेत. यामुळे काही अघटित घडल्यास त्याची जबाबदारी एसटी महामंडळ घेणार आहे का? असा प्रश्न अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघटनेचे सचिव साहेबराव जाधव यांनी विचारला आहे.

एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिकांना एसटीमध्ये सवलतीसाठी स्मार्ट कार्ड ३० जून पूर्वी काढणे सक्तीचे केल्याने अनेकांनी एसटी आगारात गर्दी केली आहे. या कार्डसाठी देशात युनिक आयडी असलेले आधारकार्ड सोबतच पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स व निवडणूक ओळखपत्र यापैकी एक सक्तीचे केले आहे. सध्या एसटीत सवलत घेताना या पैकी कोणतेही एक ओळखपत्र चालत असल्याने स्मार्ट कार्डसाठी खेड्यापाड्यातून अनेक जण आधारकार्ड घेऊन येतात. त्यावेळी त्यांना वरील तीन पैकी आणखी एक ओळखपत्र मागितले जात असल्याने वाद होत आहेत.

स्मार्ट कार्ड बनवण्याचे काम ट्रायमॅक्स कंपनीला देण्यात आले आहे. या कंपनीने सिस्टिममध्येच दोन ओळखपत्रांचे नंबर टाकणे आवश्यक केल्याने आधारकार्ड असले तरी तो फॉर्म भरता येत नाही. त्यामुळे अनेकांना परत जावे लागत आहे. ट्रायमॅक्स कंपनीकडून कार्ड येण्यासाठी अडीच ते तीन महिन्याचा कालावधी लागतो म्हणजे तो पर्यंत सवलत मिळणार नाही.



**आधार कार्ड असले तरी सिस्टिम दुसरे कार्ड असल्याशिवाय अर्ज स्वीकारत नाही. त्यामुळे आमच्या कर्मचार्‍यांना ज्येष्ठ नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. त्याबाबत रोज तक्रारी येत आहेत. आम्ही आमच्याकडे आलेल्या स्मार्ट कार्डचे नंबर बोर्डावर लिहून ठेवतो आपली पावती दाखवून त्यांनी ते घेऊन जायचे आहे.**

**-विलास गावडे, पनवेल आगार प्रमुख**

**मला कोल्हापूरला सांगण्यात आले की स्मार्ट कार्डची पावती दाखवून तुम्हाला सवलत मिळेल पण येथे सूचना लावली आहे की १ जुलै पासून स्मार्ट कार्ड शिवाय सवलत मिळणार नाही. तुम्ही आमच्याकडून त्यासाठी ५१ रुपये फी घेता तर स्मार्ट कार्ड लवकर देणे गरजेचे आहे.**

**-अशोक कांबळे, निवृत्त पोलीस**

**आधार कार्ड हे युनिक ओळखपत्र आहे. त्यावरील जन्म तारीख सगळीकडे अधिकृत धरली जात असताना स्मार्ट कार्डसाठी आणखी पुरावे कशाला मागितले जात आहेत. निवडणूक मतदानाचे वेळी ही निवडणूक ओळखपत्र नसले तर आधारकार्ड चालते. मग एसटी महामंडळाला का चालत नाहीत. गरीबांना या सवलती पासून वंचित ठेवण्याचा हा प्रयत्न दिसत आहे.**

**-निलाक्षी थळी, सामाजिक कार्यकर्त्या**



**पनवेल : येथील नगरसेविका हेमलता रवि गोवारी यांना शनिवारी नवी दिल्ली येथील ले मेरीडिअन हॉटेलमध्ये एल्फस स्टेट गव्हर्नमेंट यूनिवर्सिटी दिल्ली यांच्याकडून डॉक्टरेट पदवी देऊन सन्मानित करण्यात आले.**




**पनवेल : राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्ताने महापालिकेच्या मुख्यालयात रविवारी राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, आस्थापना विभाग प्रमुख नामदेव पिचड, महापालिका कर्मचारी उपस्थित होते.**



**पनवेल : सुनील दौंड यांची महालक्ष्मी नगर असोशिएशन नेरे, नवीन पनवेलच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल दौंड यांचे भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, तारा शेट्टी, विश्वास भोसले यांनी अभिनंदन केले.**

# सिडकोची जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया

## पाण्याच्या प्रवाहामुळे जेएनपीएकडे जाणारी मालवाहू रेल्वे गाडी बंद



**उरण : प्रतिनिधी**

नवीमुंबई शहराला तसेच परिसरातील गावांना पाणीपुरवठा करण्यात येणारी सिडकोची जलवाहिनी गव्हाण फाटा उड्डाण पूलाजवळ शनिवारी (दि. २५) सायंकाळच्या सुमारास फुटली. या पाण्याचा प्रवाह ऐवढा मोठ्या प्रमाणात होता की जेएनपीटी बंदराच्या दिशेने जाणारी मालवाहू रेल्वे बंद पडली. या जलवाहिनीतून लाखो लिटर पाणी वाया गेले असून सिडकोने तात्काळ जलवाहिनी दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे.

पेण तालुक्यातील हेटवणे धरणातून नवी मुंबई व परिसरातील गावांना सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्यासाठी सिडकोने पेण, उरण, पनवेल तालुक्यातील गावांतून आणि नवी मुंबई शहरातून जलवाहिनी टाकण्यात आली आहे. सिडकोच्या अनियोजित कारभारामुळे ही जलवाहिनी फुटण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. यामुळे शेतकर्‍यांच्या भात शेतीच आणि रहिवाशी, व्यापारी वर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहेत. यासंदर्भात वारंवार तक्रार करूनही सिडको प्रशासनाकडून शेतकरी, व्यापारी, रहिवाशांना नूकसान भरपाई मिळत नाही.

शनिवारी सायंकाळी गव्हाणफाटा येथील रेल्वे उड्डाणपूलाजवळ जलवाहिनी फुटण्याची घटना घडली आहे. पाण्याचा प्रवाह एवढा मोठ्या प्रमाणात होता की जेएनपीटी बंदराच्या दिशेने जाणारी मालवाहू रेल्वे थांबली. या घटनेमुळे लाखो लिटर पाणी वाया गेले आहे. या घटनेची माहिती मिळताच रेल्वे व सिडकोच्या अधिकारी वर्गाने घटनास्थळी धाव घेतली असून तत्काळ जलवाहिनी दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. जलवाहिनी फुटल्याने काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा झाल्याने रहिवाशांना पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

# कामोठे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना मोफत स्कूल कीट वाटप

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे, न्यू इंग्लिश स्कूल कामोठे विद्यालयात कामोठे, जुई, नौपाडा परिसरातील विविध स्तरातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यालयातील उपशिक्षक अनिल पाटील यांच्या संपर्कातून पनवेलमधील सेवा सहयोग संस्थेच्या माध्यमातून विद्यालयाला विविध शैक्षणिक साहित्य मदत मिळाली आहे. या शैक्षणिक वर्षात विद्यालयातील प्राथमिक वर्गातील पहिली ते चौथीच्या ८६ विद्यार्थांना स्कूल किट वाटप कार्यक्रम घेण्यात आला.



यामध्ये स्कूल बॅग, वह्या, पाटी, पेन या साहित्याचा समावेश आहे. या कार्यक्रमाच्या वेळी सेवा सहयोग संस्थेचे अध्यक्ष सुधीर पटेल , चंद्रमोहन नायर, निर्मला नायर, डॉ. रेड्डी, प्रवीण कुमार, माधवी पाटील, जयश्री सानप, विद्यालयाचे चेअरमन स्वामी म्हात्रे, माजी चेअरमन बाळाराम चिपळेकर उपस्थित होते.

या कार्यक्रमात विद्यालयातील एस.एस.सी. परीक्षेतील प्रथम तीन क्रमांकाचे विद्यार्थी श्रुती कापेई, जागृती पास्ते, ओमकार जाधव यांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक चाळके एस.टी. यांनी विद्यार्थांना मोफत स्कूल कीट दिल्याबद्दल सेवा सहयोग संस्थेचे आभार मानले व विद्यालयाचा एस.एस. सी. निकाल १०० टक्के लागल्याबद्दल सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्‍यांचे कौतुक केले.

# पिरकोन येथे करिअर मार्गदर्शन शिबिर

## आमदार महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती

**उरण : वार्ताहर**

पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयमधील दहावी व बारावी विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिर शनिवारी (दि. २५) आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास आमदार महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते वीरेंद्र देवस्थळी यांनी मुलांना विचारांनी मंत्रमुग्ध केले. प्राध्यापक कांगोरेंनी आमदार महेश बालदी यांचे कार्यक्रमाबद्दल अभिप्राय घेतले. आमदार महेश बालदी यांनी जीवनात उपयोगी येणारे विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले.

या वेळी भाजप उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, उरण पुर्व विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, सुदेश पाटील, भगत सर, पत्रकार तुळशिदास पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते मंगेश गावंड, तेजस ठाकूर, अशोक गावंड, पंढरी गावंड, जितेश गावंड, सुभेंद्र गावंड, दीपक गावंड आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाला गोरख ठाकूर खोपटे यांनी मेहनत घेतली. सूत्रसंचालन चेतन पाटील यांनी केले.

# पनवेल येथून वृद्ध व्यक्ती बेपत्ता

**पनवेल :** एक ६२ वर्षीय वृद्ध व्यक्ती घराबाहेर फेरफटका मारून येतो असे सांगून घरा बाहेर पडले ते अद्याप घरी न परतल्याने ते हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



संजय हरिभाऊ खरे (रा.जे. के. पार्क सोसायटी, पनवेल) असे त्यांचे नाव असून रंग सावळा, उंची पाच फूट दोन इंच, चेहरा उभट, नाक लांब व सरळ, केस काळे असून उजव्या हाताच्या मनगटात लाल पिवळा दोरा, गळ्यात काळी माळ आहे. तसेच उजव्या मांडीवर भाजलेली खून आहे. अंगात पिवळा हाफ टीशर्ट, निळी हाफ पॅन्ट घातली आहे. पायात काळी चप्पल आहे. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२२७४५२३३३) किंवा पोलीस नाईक युवराज म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कामोठे येथे आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माने सर्जिकल सेंटर आणि जनरल हॉस्पिटल कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २५) आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला भाजप नगरसेवक दिलीप पाटील, विजय चिपळेकर, नगरसेविका कुसुम म्हात्रे यांची उपस्थिती लाभली.

या वेळी पनवेलच्या शूश्रुषा सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे डॉ. संजय तरलेकर (एमडीडीएम कार्डिओलॉजी) आयोजित हृदयविकार चाचणी शिबिर झाले. यात डॉक्टरांचा सल्ला देण्यात आला. एक्स रे मध्ये पन्नास टक्के, आयराणी मध्ये पन्नास टक्के सूट, १०००च्या पॅकेजमध्ये टूडी एको सीबीसी पीएमटी लिपिड प्रोफाइल, हृदय तज्ज्ञ डॉक्टरांचा मोफत सल्ला, ऍन्जिओग्राफी व एन्जोप्लास्टी यासारखी सर्जरी, केशरी काळा रेशनकार्ड असल्यास लाख दोन लाखांची सर्जरी मोफत करण्यात येईल, असे सांगण्यात आले.

या वेळी डॉ. धनाजी माने (एमबीबीएस जनरल सर्जन लॅप्रोस्कोपीक), डॉ. प्रमिला माने (एमबीबीएस स्त्री रोग तज्ज्ञ), ॲड. संगीता आदी उपस्थित होते. जवळपास १००हून जास्त लोकांची मोफत तपासणी करण्यात आली, अशी माहिती जनसंपर्क अधिकारी कुमार लोंढे यांनी दिली.



## संपादकीय

# जनतेनेच काळजी घ्यावी

राज्यात कोरोना रुग्णांची संख्या दररोज वाढत असताना मृतांच्या संख्येतही त्या प्रमाणात वाढ झाल्याचे आता समोर येत आहे. गेले सलग सात आठवडे कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असूनही राज्य सरकारकडून त्यासंदर्भात काहीही विशेष उपाययोजना करण्यात आलेली नाही. आजवर हा फैलाव प्रामुख्याने मुंबई व आसपासच्या जिल्ह्यांपुरता मर्यादित राहिला असला तरी याच काळात राज्यात पंढरपूरची वारी होणार असल्याने सगळ्यांनीच निश्चितच आणखी खबरदारी घेण्याची गरज आहे.

**महाराष्ट्रातील दैनंदिन कोरोना रुग्णसंख्येने पाच हजाराचा आकडा ओलांडला आहे. मुंबईत ही संख्या दोन हजाराच्या वर गेली आहे. दैनंदिन रुग्णसंख्येच्या वाढत्या आलेखासोबतच काही अंशी मृत्यूचे प्रमाणही वाढत असल्याचे दिसून येते आहे. दिनांक ३० मे ते ५ जून या काळात राज्यातील कोरोना मृतांची संख्या सात इतकी होती तर त्यानंतर अवघ्या दोन आठवड्यांत दिनांक १३ ते १९ जून या काळात मृतांची संख्या १६ वर पोहोचल्याचे दिसून आले. म्हणजेच मृतांची संख्या दुप्पटीहून अधिक झाली. एकंदर गेल्या तीन आठवड्यांत कोरोनाचे संकट पुन्हा तीव्र होत चालल्याचे स्पष्टपणे दिसत असूनही अद्यापही राज्य सरकारने त्यावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने काहीही हालचाल केलेली दिसत नाही. राज्यात गेल्या आठवडाभरात जो काही राजकीय पेच उद्‌भवला आहे, त्यानंतर तर राज्यात सरकार आहे वा नाही अशीच परिस्थिती निर्माण झाली असून जनतेच्या सर्वच प्रश्नांकडे संपूर्ण दुर्लक्ष सुरू आहे. राज्यात जूनच्या पहिल्या आठवड्यापासून कोरोनाचा फैलाव पुन्हा डोकेवर काढताना दिसू लागला. सर्वसाधारणपणे ओमायक्रॉनच्या चार उपप्रकारांचा फैलाव राज्यात दिसत असून यापासून होणारा संसर्ग सौम्य असल्याचे सध्या तरी दिसत आहे. परंतु सातत्याने संख्येत होत असलेली वाढ लक्षात घेता संपूर्ण गाफिलपणा निश्चितच धोकेदायक ठरू शकेल. गेल्या आठवड्यात राज्यात नोंदल्या गेलेल्या १६ कोरोना मृत्यूंपैकी १० मृत्यू मुंबईत नोंदले गेले होते तर उर्वरित मृत्यूंपैकी दोन रायगड जिल्ह्यात आणि ठाणे, वसई–विरार, जळगाव आणि सातारा येथे प्रत्येकी एका मृत्यूची नोंद झाली होती. मुलांमधील कोरोनासंसर्गातही दीर्घकाळ त्रास होतो हेही आता संशोधनातून दिसून आले आहे. यापूर्वी प्रौढांमध्ये हे दिसून आले होते. परंतु आता जसजशी संशोधनातून अधिक माहिती हाती येऊ लागली आहे, तसतसे मुलांमध्येही कोरोनाचा त्रास दीर्घ काळ जाणवू शकतो हे स्पष्ट होऊ लागले आहे. मुलांसाठीच्या कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहिमेची आपल्याकडे नीट अंमलबजावणीच झालेली नाही. मुंबईत पालिका शाळांकडील माहितीनुसार १२ ते १५ या वयोगटातील निव्वळ ४७ टक्के मुलांनी लसीची पहिली मात्रा घेतली आहे तर निव्वळ २० टक्के मुलांनी दुसरी मात्रा घेतली आहे. लसीकरणाची मोहीम एकूणात थंडावली असल्यामुळे स्वाभाविकच मुलांच्या लसीकरणावरही त्याचा परिणाम दिसतो आहे. प्रौढांसाठीच्या बूस्टर डोसबद्दलही जनतेमध्ये गैरसमज पसरले असून हा डोस विशिष्ट काळातच घेणे का आवश्यक आहे हे जनतेपर्यंत पोहोचवण्याची नितांत गरज आहे. सध्याच्या कोरोना फैलावात सौम्य लक्षणे दिसून येत असल्यामुळे जनतेमध्ये बूस्टर डोस घेण्याबाबत तसेच मुलांना लस देण्याबाबत कमालीची उदासीनता दिसून येत आहे. सत्ताधारी महाविकास आघाडी आपल्या खुर्च्या वाचवण्यात मशुल असताना जनतेने स्वत:च स्वत:ची काळजी घेण्याला तूर्तास तरी दुसरा पर्याय दिसत नाही.**

# कर्जत तालुक्यातील सर्वच रस्त्यांची स्थिती बिकट!

कर्जत तालुक्यात ३५०० मि.मी. पाऊस पडतो. रस्ते दरवर्षी खराब होण्याला हे एक प्रमुख कारण आहे. त्यात तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी करोडो रुपयांचा खर्च शासन करीत आहे. तरीदेखील कर्जतचे रस्ते पावसाळ्यात खड्ड्यात हरवून जातात. दुसरीकडे कर्जत तालुक्यातील अनेक रस्त्यांची कामे निधी मंजूर होऊनदेखील पूर्ण होत नसल्याने कर्जतच्या रस्त्यांवर खड्डेच खड्डे अशी स्थिती पहिल्याच पावसात सध्या दिसून येत आहे.









**खबरबात**
संतोष पेरणे

कर्जत तालुक्यातील महत्त्वाच्या रस्त्यांमध्ये एक राष्ट्रीय महामार्ग तर पाच राज्यमार्ग असून प्रमुख जिल्हा मार्ग असे रस्त्यांचे जाळे आहे. मात्र तालुक्यातून जाणारा एकमेव राष्ट्रीय महामार्ग हा मात्र सुस्थितीत आहे, मात्र तालुक्यातील अन्य रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. तालुक्यातील सर्वात जास्त असलेल्या प्रमुख रस्त्यांमध्ये कळंब–पाषाणे–वांगणी रस्त्यावरील एका मोठ्या पुलावरून वाहतूक शासनाने अवजड वाहनांसाठी बंद केली आहे. मागील वर्षात तब्बल चार कोटी खर्च करूनदेखील रस्त्याची अवस्था बिकट आहे. रस्ता खराब असल्याने या रस्त्याने वाहतूक होणारी एसटीदेखील परिवहन मंडळाला बंद करावी लागली आहे. याच भागात असलेल्या बोरगावकडे जाणारा रस्तादेखील मोठमोठ्या खड्ड्यांनी व्यापला आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. आता पावसाळा सुरु झाल्याने अनेक ठिकाणी रस्ता पाण्यात हरवला असल्याचे दिसून येत आहे. पाषाणे आणि माले गावात तर रस्त्यात पाणी साचले आहे. तर या कळंब–पाषाणे आणि उल्हास नदी पूल या रस्त्यासाठी १० कोटींचा निधी मंजूर केला असून ते काम निविदा स्तरावर असल्याचे सांगण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील महत्त्वाच्या रस्त्यांची अवस्था बिकट आहे. तालुक्यात १० वर्षांपूर्वी बनविण्यात आलेला साळोख–ओलमण–चई–नांदगाव हा रस्ता नव्याने बनविण्याची गरज निर्माण झाली आहे. हा पर्यायी रस्ता असून एवढे खड्डे या रस्त्यावर पडले असून अनेक ठिकाणी रस्त्यावरील डांबर शोधावे लागेल अशी या रस्त्याची स्थिती आहे. तालुक्यातील एसटी आगाराला चांगले उत्पन्न देत असलेल्या पिंपळोली–गुडवण या रस्त्याची अवस्थादेखील चांगली नाही. या रस्त्याच्या दूरवस्थेबद्दल स्थानिकांनी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला असता निधी मंजूर करण्यात आला. या रस्त्याचा भाग असलेल्या तळवडे–दहिवली या भागातून वाहतूक करणे जिकीरीचे झाले आहे. पलीकडे देवपाडा गावाकडे जाणारा रस्ता पुढे वारे भागाकडे मुरबाडला जाऊन मिळत असल्याने हा पर्यायी रस्ता म्हणून ओळखला जायचा. मात्र देवपाडापासून पुढे या डांबर वाहून गेलेल्या रस्त्याने वाहतूक करणे म्हणजे मातीच्या रस्त्याने वाहतूक करण्यासारखे झाले आहे.

तालुक्यात सर्वात महत्त्वाचा रस्ता समजला जाणारा मुरबाड ते कर्जतपासून खोपोली या राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ या रस्त्याचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. रस्त्यावरील पुलांची कामे बाकी आहेत. तर तालुक्यातील कर्जत–कल्याण राज्यमार्ग हादेखील सुस्थितीत असला तरी कर्जत ते वडवली या भागातील आरसीसी काँक्रीटच्या रस्त्याची स्थिती नाजूक आहे. त्या भागातील रस्त्यावर काँक्रीटच्या रस्त्यावर उंचवटे असल्याने दररोज अपघात होत आहेत. तालुक्यातील सर्वात खराब रस्ते तालुक्यातील राज्यमार्ग रस्ते असून माथेरान– नेरळ–कळंब या राज्यमार्ग रस्त्यावर चार कोटी रुपये खर्चूनदेखील पूर्णपणे सुस्थितीत झाले नाही. त्यात नेरळ–कशेळे–भीमाशंकर या राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ दामत परिसरात रस्त्यावर खड्ड्यांचे प्रमाण अधिक आहे. तालुक्यातील चिंचवली–कडाव–जांभिवली–दहिवली–कोंदिवडे या राज्यमार्ग रस्त्यावर मागील दोन वर्षांपूर्वी निधी मंजूर आहे. मात्र यातून होणारी कामे संथगतीने आहेत. चिचवली गाव भागातील सिमेंट काँक्रीटीकरण आता सुरु झाले असून त्यामुळे गेली काही वर्षे स्थानिकांना आणि वाहनचालक यांना खड्डेमय रस्त्यातून जावे लागत आहे.

दरम्यान, रायगड जिल्हा परिषदेच्या निधीमधून आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून झालेल्या कामांची यादी मोठी आहे पण ती कामे पूर्ण झाली की नाही याचा शोध शासनाचे अधिकारी घेणार आहेत काय? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. प्रशासनाकडूनश अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे. ग्रामीण भागातील रस्त्याबाबत निधीच्या विनियोगाचा प्रश्न सातत्याने उपस्थित केला जात आहे.

### करोडो रुपयांचा निधी येऊनही कामे नाहीत

तालुक्याच्या आदिवासी भागातील सुगवे–खांडस भागातील जुन्या रस्त्याची दुरुस्ती अनेक वर्षे झालेली नाही. त्यामुळे रस्त्यावरून वाहतूक बंद होण्याची वेळ आली आहे. त्याचवेळी याच भागातील कशेळे–लोभेवाडी रस्त्याची अवस्थादेखील खड्डेमय अशीच आहे. गुडवणपासून अंजप फाटा या भागातील रस्त्याची अवस्था अनेक वर्षे आहे तशीच आहे. अंजप फाटा ते बोरिवलीपासून नालढे हा रस्ता तालुक्यातील सर्वात खराब रस्ता समजला जात आहे. त्या भागातील रहिवाशी जीवमुठीत घेऊन त्या भागातून प्रवास करीत असतात. तर तालुक्यातील आदिवासी भागातील गाव जोडणारे रस्ते हे डांबरीकरणाच्या प्रतीक्षेत आहेत. तालुक्यातील रस्त्यांसाठी शासनाच्या विविध निधीमधून करोडो रुपयांचा निधी येत असून त्या निधीतून कामे का होत नाही याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे. दरम्यान, दरवर्षी पावसाळा आला की रस्त्यांचा प्रश्न हा निर्माण होत असतो.

## बदलते तंत्रज्ञान

### नको असलेल्या कॉल्सपासून त्वरीत मिळवा सुटका

अनेकदा फोनवर येणारे स्पॅम आणि टेलिमार्केटिंग कॉल्स आपल्याला त्रास देतात. काहीवेळा या कॉल्सकडे दुर्लक्ष करण्याच्या नादात महत्त्वाचे कॉल्स चुकतात. अनेकदा फोनवर येणारे स्पॅम आणि टेलिमार्केटिंग कॉल्स वापरकर्त्यांना त्रास देतात.

अनेकवेळा अशी वेळ येते, जेव्हा तुम्ही एखाद्या महत्त्वाच्या मीटिंगमध्ये किंवा कामात अडकलेले असता तेव्हा असे कॉल्स नेहमी त्रास देतात. काहीवेळा मात्र अशा कॉल्सकडे दुर्लक्ष करण्याने काही महत्त्वाचे चुकतात.



अशा परिस्थितीत, आपली इच्छा असेल तर आपण आपल्या फोनमध्ये डू नॉट डिस्टर्ब हे फीचर सक्रिय करू शकता. ही सुविधा जिओ, एअरटेल आणि वोडाफोन आयडिया सिममध्ये आहे. आज आपण जाणून घेऊया हे फीचर कसे सुरु करायचे. जर जिओ वापरकर्त्यांना स्पॅम कॉल्स टाळायचे असतील तर त्यासाठी प्रथम फोनमधील माय जिओ ॲप डाउनलोड करा. ॲप उघडा आणि लॉग इन केल्यानंतर, डाव्या बाजूला सेटिंग्ज बटणावर क्लिक करा.

तुम्ही सेटिंग्जवर क्लिक करताच, तुम्हाला डीएनडी म्हणजेच डू नॉट डिस्टर्बचा पर्याय मिळेल, त्यावर क्लिक करा. यानंतर, कंपनीकडून तुमच्या नंबरवर एक संदेश येईल ज्यामध्ये माहिती दिली जाईल की, तुमच्या नंबरवर सात दिवसांच्या आत डू नॉट डिस्टर्ब सेवा सक्रिय होईल. वोडाफोन–आयडिया वापरकर्ते कंपनीच्या वेबसाइटवर जाऊन डू नॉट डिस्टर्ब सक्रिय करू शकतात. डू नॉट डिस्टर्बवर क्लिक केल्यानंतर तुम्हाला तुमचा फोन नंबर तिथे टाकावा लागेल. तुमच्या फोनवर एक ओटीपी येईल, तो प्रविष्ट करा आणि सबमिट बटणावर क्लिक करा. या प्रक्रियेनंतर तुमच्या नंबरवर डू नॉट डिस्टर्ब सक्रिय होईल. वेबसाइटला भेट देऊन तुम्ही तुमच्या नंबरवरील डू नॉट डिस्टर्बचा इतिहासदेखील तपासू शकता. एअरटेलमध्ये डू नॉट डिस्टर्ब कसे सक्रिय करावे. यासाठी तुम्हाला सर्वप्रथम एअरटेलच्या वेबसाईटवर जावे लागेल. जिथे तुम्हाला एअरटेल मोबाइल सर्व्हिस या पर्यायावर क्लिक करावे लागेल. यानंतर स्क्रीनवर एक पॉप–अप बॉक्स दिसेल, तिथे तुमचा नंबर टाका. तुमच्या मोबाइल नंबरवर एक ओटीपी येईल. हा ओटीपी टाकल्यानंतर स्टॉप ऑल पर्यायावर क्लिक करा. असे केल्याने तुमच्या मोबाइल नंबरवर डू नॉट डिस्टर्ब सेवा सक्रिय होईल.

# अवलिया संगीतकार आर. डी. बर्मन

## निमित्त

**राहुलदेव बर्मन उर्फ आर. डी. बर्मन यांचा जन्म २७ जून १९३९ रोजी झाला. हे एक भारतीय संगीत दिग्दर्शक होते. त्यांना बॉलिवूडमधील सर्वश्रेष्ठ संगीतकारांपैकी एक मानले जाते. आपल्या १९६१ ते १९९४ दरम्यानच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी ३३१ चित्रपटांना संगीत दिले. तसेच स्वतः काही गाणीदेखील म्हटली आहेत. किशोर कुमार व आशा भोसले हे त्यांचे विशेष आवडीचे पार्श्वगायक. बर्मन यांच्या कार्याचा घेतलेला हा छोटासा आढावा–**



सचिनदेव बर्मन १९४४ साली कलकत्त्याहून मुंबईत आले. त्यावेळी राहुलदेव हे पाच वर्षांचे होते. मात्र, चित्रपटसृष्टीत जम बसेपर्यंत कुटुंबाला येथे ठेवण्यात अर्थ नाही, या निर्णयापर्यंत सचिनदेव आले आणि त्यांनी माय–लेकांना पुन्हा कलकत्त्याला पाठविले. कलकत्त्यात लहानाचे मोठे झालेल्या राहुलदेव यांना अभ्यासात कधीच रस नव्हता. त्यांचा दिवस सायकल चालविणे, पोहणे, मित्रांसोबत भटकणे यातच संपत असे. कुठेही न शिकता त्यांनी माऊथ ऑर्गनवर प्रभुत्व मिळविले. वेळ काढून कलकत्त्यात येणारे सचिनदेव मुलाच्या करामती पाहून काळजीत पडले होते. हा मुलगा तर फारच उनाड झाला आहे, मोठेपणी तो काय करणार, असा त्यांचा नेहमीचा सूर असे. सचिन यांचा हा दृष्टिकोन राहुलदेवच्या शाळेतील बक्षीस समारंभामुळे पुढे बदलला. या कार्यक्रमात सचिनदेवांच्या प्रमुख उपस्थितीत राहुलने व्यासपीठावरून माऊथ ऑर्गन सफाईदारपणे वाजवून दाखविले. दुसऱ्या दिवशी सचिनदेवांनी त्याला विचारले, पुढे काय करायचे ठरविले आहेस, यावर 'मला तुमच्यापेक्षा मोठा संगीतकार व्हायचे आहे' हे राहुल यांचे उत्तर सचिनदेवांसाठी अनपेक्षित होते.

या प्रसंगानंतर सचिनदेवांनी राहुलला प्रथम ब्रजेन विश्वास यांच्याकडे तबला व पुढे उस्ताद अली अकबर खान यांच्याकडे सरोद शिकण्यासाठी पाठविले. त्यानंतर राहुलदेव यांनी दाखवलेला झपाटा विलक्षण होता. वयाच्या १६व्या वर्षी मुंबईत दाखल झालेले राहुल हे लगेचच वडिलांचे सहाय्यक म्हणून काम करू लागले. एवढेच नव्हे तर त्या वयात त्यांनी स्वरबद्ध केलेल्या 'ए मेरी टोपी पलटके आ' (फंटूश) आणि 'सर जो तेरा चकराए' (प्यासा) या चालींचा सचिनदेवांनी उपयोग केला.

सचिनदेवांचा भर लोकगीतांवर तर राहुलदेवांना कोणताही संगीतप्रकार वर्ज्य नव्हता. साहजिकच 'चलती का नाम गाडी' या चित्रपटापासून पंचमच्या करामतीमुळे सचिनदेवांच्या गाण्यांची शैली कमालीची बदलली. सचिनदेवांना सहाय्य करण्यात राहुलदेवांची उमेदीतील अनेक वर्षे वाया गेली. सचिनदांनी नाकारलेला 'भूत बंगला' हा चित्रपट त्यांना मिळाला, परंतु मेहमूदने त्यापूर्वी 'छोटे नबाब'ची निर्मिती सुरू केली आणि तो राहुलदेव बर्मन यांचा पहिला सिनेमा ठरला. 'आराधना'च्या गाण्यांच्या निर्मितीत पंचमचा सिंहाचा वाटा असूनही त्या गाण्यांच्या तबकड्यांचे अनावरण सचिनदेवांच्या निवासस्थानी झाले, तेव्हा राहुल यांचे कोणीही कौतुक केले नाही, पूर्ण कार्यक्रमभर ते एका कोपऱ्यात उभे होते. स्वतंत्रपणे संगीत देण्याची हीच वेळ आहे, या निर्णयापर्यंत तेव्हा ते आले. वडील आणि मुलगा आता स्पर्धक झाले होते.

पंचम एकेक शिखर सर करत असताना सचिनदेव मात्र झाकोळले जाऊ लागले. १ ऑक्टोबर १९७४ या सचिनदेवांच्या वाढदिवसाच्या रात्री न चुकता घरी फेरी मारणारे राहुलदेव रात्री अकरा वाजता घरी पोहोचले. दाराची बेल वाजविणार तोच माझ्या कानावर 'आप की कसम' आणि 'अजनबी' या चित्रपटांतील गाणी पडली. वडील माझी गाणी ऐकतायत हे कळल्यानंतर राहुलदेवांनी संकोचून बाहेरच थांबणे पसंत केले. गाण्यांचा आवाज थांबल्यानंतर ते घरात शिरले. त्यानंतर सचिनदेव म्हणाले, 'पंचम माझ्यापेक्षा मोठा संगीतकार झाला आहे हे मी मान्य करतो, असा मुलगा लाभणे ही भाग्याची गोष्ट आहे. गुणवत्तेच्या कसोटीवर मुलगा वडिलांपेक्षा श्रेष्ठ ठरत असेल तर त्यासारखी आनंदाची गोष्ट नाही असे ते म्हणाले.





**क्लिक...क्लिक...!**

**पावसाळा सुरू झाला की हमखास मिळणारी रानभाजी म्हणजे अळू. सध्या जिल्ह्यातील बाजारात अळू विक्रीसाठी येऊ लागले आहे. मात्र मागील वर्षी १० रुपयांना मिळणारा अळूचा एक वाटा यावर्षी २० रुपयांना मिळत आहे.**

## आरोग्य प्रहर

### केस गळतीवर उपाय

केसगळतीची समस्या पुरुषांसह स्त्रियांनाही भेडसावते. या समस्येमागे असंतुलित आहार, प्रदूषण आणि ताणतणाव आदी कारणे आहेत. इतरही अनेक कारणे या गळतीमागे असू शकतात. ती रोखण्यासाठी अनेक जण घरगुती उपाय करतात. त्यामुळे फायदा होण्याऐवजी इजाच होण्याचा अधिक धोका असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

केस गळण्यापासून रोखण्यासाठी बऱ्याच घरगुती उपायांमागे गैरसमजच जास्त असतात. प्रत्यक्षात केसगळती रोखण्यास त्याचा फायदा होत नाही, असे तज्ज्ञ सांगतात. त्यापैकी काही गैरसमज आपण पाहूया. तेलाच्या मसाजाने



केसगळती थांबते, असा एक मोठा गैरसमज आहे. प्रत्यक्षात अशा मसाजने तणाव दूर होऊन आराम मिळतो. पण गळती थांबू शकत नाही. केसगळती थांबविणाऱ्या शाम्पूचाही काही फायदा होत नसतो. त्यात असे कोणतेही घटक नसतात. त्याने केस फक्त स्वच्छ होतात. गळती होते म्हणून काही जण शाम्पू वापरणे थांबवतात. परंतु तज्ज्ञांच्या मते आरोग्यासाठी केस नियमित स्वच्छ करणे गरजेचे असते. गळती रोखण्यासाठी कांद्याचा रस उपयुक्त ठरतो, असा कोणताही शास्त्रीय पुरावा नाही. यावर लिंबू व दही उपयोगी आहे. दह्यामुळे केसातील कोंडा कमी होण्यास मदत होते. मात्र, लिंबाचा वापर केसांसाठी करू नये. केसांसाठी घरी तयार केलेले पॅकही फारसे उपयोगी पडत नाही. ब जीवनसत्त्वयुक्त पूरकेही गळती रोखण्यासाठी प्रभावी ठरत नाहीत. केस कापून कमी लांबीचे ठेवण्याने केस गळती लक्षणीय दिसत नाही एवढेच. ही गळती थांबत नाही. केसांच्या 'स्पा'मुळे त्यांची निगा राखली जाते, परंतु गळती रोखता येत नाही.

केस गळती रोखण्यासाठी रक्त तपासणी करावी. त्याद्वारे शरीरातील संप्रेरकांचे असंतुलन किंवा लोह कमतरता तपासून, त्यावर उपाय केल्यास केसगळतीचे मूळ कारण संपवता येते. पौष्टिक आहार, ताजी फळे–भाजीपाल्याच्या नियमित सेवनाने केसांना फायदा होतो. नियमित व्यायाम व तणावमुक्तीनेही लाभ होतो, असा सल्ला तज्ज्ञ देतात. वैद्यकीय सल्ल्याने 'पेप्टाईड सिरम' दोनदा केसांना लावावे. 'मिनॉटक्सिडिल' लोशन केसांना लावल्याने केस विरळ होण्याचे प्रमाण कमी होते, तज्ज्ञ सांगतात. मात्र केसगळतीकडे दुर्लक्ष करु नये. एकदा केसगळती सुरु झाली की ती थांबणे अवघड होऊन जाते.

# बोर्ली खाडीपात्रातील कांदळवनतोड

## अवैध भरावामुळे पूरसदृश्य स्थिती; ग्रामस्थ आक्रमक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

बोर्ली खाडीपात्रातील कांदळवन तोडून अवैध भराव करण्यात आला आहे. त्यामुळे पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. याबाबत बोर्ली ग्रामस्थांनी एकत्रीत येऊन आक्रमक भूमिका घेतली असून पावसाळ्यात पुरसदृश्य स्थिती निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी धनदांडग्यांसह प्रशासनाची राहील असा इशारा त्यांनी दिला आहे.

बोर्ली खाडीपात्रातील शासकीय जागेवरील कांदळवन तोडून, अवैध भराव केल्याने पूर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे बोर्ली साईमंदिरात ताराबंदर कोळी समाज, बोर्ली कोळी समाज, पंचकुम समाज, मुस्लिम समाज, बौध्द समाज यांच्या संयुक्त सभेचे आयोजन करण्यात आले होते.

गतवर्षी पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्याने बोर्ली बाजारपेठेत पूराचे पाणी घुसले होते. त्या वेळी बाजारपेठेतील व्यापाऱ्यांना मोठे आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागले होते. कांदळवन तोडीने तसेच अवैध भरावामुळे भविष्यात तशा प्रकारची स्थिती येईल, अशी भिती सभेत व्यक्त करण्यात आली.

बोर्ली खाडीपात्रानजीक गट क्रमांक ५४ या शासकीय जागेतील कांदळवन तोडून तेथे भराव करण्यात आला आहे, या अवैध कामाविरोधात निषेधाचा ठराव या सभेत करण्यात आला. तसेच पावसाळ्यात पूर आल्यास त्याला कांदळवनाची तोड व अवैध भराव करणारा गट क्रमांक ४९चा मालक आणि प्रशासन जबाबदार राहील, असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या सभेस बोर्ली, ताराबंदर, सुरई येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



(छाया : महेंद्र खैरे)

# मच्छीमार संघर्ष यात्रा मंगळवारी मुरूडमध्ये

**मुरूड : प्रतिनिधी**

मच्छीमारांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी नॅशनल फिशवर्कर्स फोरम व महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीच्या वतीने पालघर (झाई) ते मालवणपर्यंत संघर्ष यात्रा काढण्यात आली असून, या संघर्ष यात्रेचे मंगळवारी (दि. २८) मुरूड येथे आगमन होणार असून तिच्या स्वागतासाठी असंख्य मच्छीमार उपस्थित राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीचे रायगड जिल्हा अध्यक्ष मनोहर बैले यांनी दिली.

एलईडी व पर्ससीन मासेमारीवर बंदी आणावी, नौका जप्तीच्या कायद्यात सुधारणा करावी, डिझेल परतावा त्वरित अदा करण्यात यावा, एनसीडीसी व इतर थकीत कर्जावरील व्याज व मुद्दल माफ करण्यात यावे, मच्छीमार घरासाठी वापरत असलेल्या जमिनीचे सातबारे उतारे मच्छीमारांच्या नावे करावेत अशा अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबीत असून, त्याकडे लक्ष वेधण्याकरिता मच्छिमार संघर्ष यात्रा काढण्यात आली आहे. २४ जून रोजी पालघर येथील झाई येथून निघालेल्या या संघर्ष यात्रेचे मंगळवारी मुरूडमध्ये आगमन होत असून, त्यानिमित्त सकाळी ९ वाजता जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेला महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीचे अध्यक्ष लिओ कोलासो, कार्याध्यक्ष रामकृष्ण तांडेल, सरचिटणीस किरण कोळी, ज्योती मेहेर, रविकांत तोरोस्कर, जॅकसन पी. उपस्थित राहणार असून, ते स्थानिक मच्छीमारांचे प्रश्न समजावून घेणार असल्याची माहिती बैले यांनी पत्रकारांना दिली.

# म्हसळ्यात दूषित, क्षारयुक्त पाणीपुरवठा

**तालुक्यातील ४० पाणीनमुने पिण्यास अयोग्य**

**म्हसळा : प्रतिनिधी**

नगरपंचायत व तालुक्यातील ३९ ग्रामपंचायती मार्फत म्हसळा तालुक्यातील नागरिकांना पिण्याचे पाणी पुरविले जाते. मात्र पाणी तपासणी अहवालानुसार म्हसळा तालुक्यात दूषित, क्षारयुक्त पाणीपुरवठा होत असल्याचे निष्पन्न होत आहे.

म्हसळा शहर व तालुक्यांतील बहुतांश ठिकाणी धरणे, विहिरी, बोअरवेलद्वारे पाणीपुरवठा केला जातो. तालुक्यातील ५-६ पाणीपुरवठा योजनांमध्ये जलशुध्दीकरणाचे प्लॉट आहेत. मात्र अन्य योजनांमध्ये जलशुध्दीकरणाचे कोणतेही पर्याय न वापरता दूषित, गाळयुक्त पाणी नागरिकांना पुरविले जाते. म्हसळा नगरपंचायती मार्फत पुरवठा करण्यात येण्याऱ्या पाण्याचे नमुने तपासले असता हे पाणी पिण्यास आयोग्य आल्याचे आरोग्य विभागाच्या प्रतिनिधीने सांगितले.

म्हसळा तालुक्यातील अनेक विंधन विहिरींचे पाणी क्षारयुक्त व दूषित असल्याचे पुढे येत आहे. तालुक्यांतील आरोग्य विभागाकडून विविध स्त्रोतांतून गोळा केलेल्या पाणी नमुन्यापैकी ३६ नमुने पिण्यास अयोग्य आले, तर प्रत्येक ग्रामपंचायतीत नेमलेल्या ३९जलसुरक्षकांकडून पाठविण्यात येणाऱ्या पाणी नमुन्यापैकी केवळ चार पाणी नमुने पिण्यास आयोग्य निष्पन्न झाले आहे.

तालुक्यात फार मोठया प्रमाणात दूषित पाण्याचा पिण्यासाठी वापर केला जात आहे. तसेच पावसाळ्यात ठिकठिकाणी साचणाऱ्या दूषित पाण्यामुळे आजार पसरतात. या काळात कावीळ, गॅस्ट्रो, लेप्टोस्पायरोसिस, डायरिया, कॉलरा, वाताचे विकार या दुषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांबरोबरच सर्दी, खोकला, ताप यासारखे आजार जडतात.

तालुक्यातील म्हसळा ग्रामीण रुग्णालय तसेच मेंदडी, म्हसळा, खामगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि पाभरे येथील जि.प. दवाखान्यात एप्रिल ते जून या कालावधीत किमान २१३ रुग्णांवर उलटी, जुलाब, लूज मोशनचे उपचार केल्याचे सूत्रांनी सांगितले.

# कर्जत वेणगाव येथील शिबिरात ४६ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोठे वेणगाव येथील राणाप्रताप मित्र मंडळाच्या वतीने स्व. प्रितेश शिंदे यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास घाटकोपर येथील समर्पण रक्तपेढीचे सहकार्य लाभले होते. या शिबिरात ४६ जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी संयोजित कर्जत, खालापूर तालुक्यातील हे ४५३ वे रक्तदान शिबिर होते.



मोठे वेणगावमधील विठ्ठल मंदिराच्या सामाजिक सभागृहात घेण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी सरपंच भाई गायकर यांच्या हस्ते करण्यात आले. राजिपचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, श्री महालक्ष्मी देवस्थानचे अध्यक्ष रंजन दातार, सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, मंडळाचे अध्यक्ष जितेश आम्रे, उपाध्यक्ष वैभव सावंत, कैलास शिंदे, सचिव हरीश जाधव आदी या वेळी उपस्थित होते.

या शिबिरात वैभव पेठे या युवकाने सर्वप्रथम रक्तदान केले. विशेष म्हणजे ज्येष्ठ पत्रकार विजय मांडे यांनी वयाच्या ६५ व्या वर्षांच्या पदार्पणात आपले ६९ वेळचे रक्तदान करून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. समर्पण रक्तपेढीच्या डॉ. अभिषिका वाघचौरे, माधुरी सावंत, दीपेश सरदार, शिल्पा वाघमारे, सागर कांबळे, सान्वी किल्लेकर, अखिलेश भारती, सूरज किल्लेकर आदींनी रक्त संकलनाचे काम केले. सूत्रसंचालन समीर शिंदे यांनी केले. धनंजय दुर्गे, समीर चव्हाण, कैलास घारे, सुनील आंग्रे, राहुल देशमुख, राघवेंद्र केलटकर, भारत सावंत, जयवंत केलटकर, रुपेश चव्हाण, पराग आंबवणे, प्रशांत आंग्रे यांच्यासह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# सुधागड तालुक्यात कृषी संजीवनी सप्ताह

## शेतकऱ्यांना अनुदानावर ड्रमसिडर यंत्र उपलब्ध

**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये २५ ते ३०जून या कालावधीत कृषी संजीवनी सप्ताह साजरा करण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांना अनुदानावर ड्रम सिडर यंत्र उपलब्ध करून देण्यात आले आहे.

कृषी संजीवनी सप्ताहात शेतकऱ्यांना भात लागवडीच्या आधुनिक पद्धती, जमीन आरोग्यपत्रिका आधारित खतांचा वापर, १० टक्के रासायनिक खतांची बचत, किड-रोग संरक्षण, काढणी पश्चात तंत्रज्ञान, भात पीक विमा, शेती शाळा आणि कृषीविषयक योजना यांची माहिती क्षेत्रीय भेट, प्रशिक्षण, प्रात्यक्षिकांद्वारे देण्यात येणार आहे. पीएम किसान योजनेचे ई-केवायसी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच १ जुलै रोजी कृषिदिन साजरा करण्यात येणार आहे. याबरोबरच राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत भातपीक लागवड व दर्जा सुधारणा कार्यक्रमांतर्गत तालुक्यात हस्तचलीत ड्रमसिडर यंत्राद्वारे भात लागवडीची प्रात्यक्षिके तालुका कृषी विभागामार्फत आयोजित करण्यात आली आहेत.

या योजनेअंतर्गत भात लागवडीच्या प्रात्यक्षिकासाठी हस्तचलित ड्रमसिडर यंत्र, तणनाशक, युरिया-डिएपी ब्रिकेट्स, मनुष्यबळ विकास अंतर्गत प्रशिक्षण, माती नमुने काढणे या बाबींचा समावेश आहे. ड्रमसिडर यंत्राची किंमत ७२०० रुपये अधिक कर इतकी असून जे शेतकरी ड्रमसिडर यंत्राद्वारे भात लागवड करण्यास इच्छुक आहेत त्यांना हे यंत्र खरेदी करण्यासाठी रु २३३४ इतके अनुदान देण्यात येणार आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी संबंधीत कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडल कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा तसेच कृषी संजीवनी सप्ताह अंतर्गत करण्यात येणाऱ्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सुधागड तालुका कृषी अधिकारी जे. बी. झगडे यांनी केले आहे.



# चौकमध्ये शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन

**चौक : रामप्रहर वृत्त**

विद्या प्रसारिणी सभा या संस्थेच्या चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली.

संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश देशमुख यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून शाहू महाराजांचे कार्य विषद केले. प्राची जाधव यांनी सूत्रसंचालन केले. शाळेचे मुख्याध्यापक बादशा भोमले, पर्यवेक्षक दिलीप मोळीक, सोनाली पाटील यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी या वेळी उपस्थित होते. अनिल बेडेकर यांनी आभार मानले.






# सहकारी संस्थांना व्यापारी संस्थांचे स्वरूप -विद्याधर अनास्कर

**अलिबाग : प्रतिनिधी**

ज्याला पत नाही अशा सर्वसामान्य व्यक्तीला सहकार्य करून त्याला पत मिळवून देणे हा सहकाराचा हेतू आहे. मात्र आता सहकारात व्यक्तीपेक्षा भांडवलाला महत्त्व आले आहे. नफा किती मिळाला हे पाहिला जात आहे. त्यामुळे सहकारी संस्थांना व्यापारी संस्थांचे स्वरूप आले आहे, असे प्रतिपादान महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी कुरूळ येथे केले.



सहकार दर्शन पाक्षिकाच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त अलिबाग तालुक्यातील कुरूळ येथील सुरूची रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विद्याधर अनास्कर मुख्यवक्ते म्हणून बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोकण प्रांत बौध्दिक प्रमुख उदय शेवडे, बुलढाणा अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे, सहाकरा तज्ज्ञ गणेश निमकर, सहकारी संस्था निबंधक प्रदीप बर्गे, महाराष्ट्र राज्य पतसंस्था महासंघाचे संचालक सुरेश पाटील या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सहकार दर्शनच्या १२५ व्या अंकाचे अनावरण या वेळी करण्यात आले.

सर्वसामान्य माणासाला देशाच्या मुख्य आर्थिक प्रवाहात आणण्याचे काम सहाकाराने केले आहे. सहकार ही सरकार प्रणित सामाजिक व आर्थिक चळवळ आहे. तिला सत्तेचे कुंपण असायला हवे. तसे न होता हे कुंपणच शेत खाऊ लागले आहे. गरज नसलेल्यांना सदस्यत्व दिले गेल्यामुळे हे घडत आहे.त्यामुळे सहकारी संस्था धोक्यात येऊ लागल्या आहेत, असे अनास्कर म्हणाले.

आपण लहान आहोत, हा नुन्यगंड काढून पतसंस्थांनी आव्हानांना सामोरे जाऊन काम केले पाहिजे. सर्वसामान्यांना पतसंस्थांचाच आधार आहे. सहकारी संस्थांनी आपल्याला शिस्त लावून घेतली पाहिजे. सहकार वाढीसाठी प्रयत्न केले पाहिजेत असे, अनास्कर यांनी सांगितले. शिरीष देशपांडे, उदय शेवडे यांचीही या वेळी भाषणे झाली.

सहकार दर्शनचे संकल्पक गिरीश तुळपुळे यांनी प्रास्ताविक केले. कमळ नागरी पतसंस्थेच अध्यक्ष सतिश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सहकार दर्शनचे संपादक नंदकुमार चाळके यांनी आभार मानले.

# अलिबागमध्ये विद्यार्थ्यांचा सत्कार; फोटोग्राफर असोसिएशनचा उपक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा फोटोग्राफर्स अँड व्हिडिओग्राफर असोसिएशन संलग्न अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशन आणि अश्विनी टिचर्स क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २६) अलिबाग तालुक्यातील ग्रामीण भागातील शाळांमधून दहावीमध्ये प्रथमआलेल्या व अश्विन टिचर्स क्लासेसमधील अकरावी व बारावीमध्ये विशेष गुण संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात संपन्न झाला.



आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते सचिन राऊळ, रायगड फोटोग्राफर्स अँड व्हिडिओग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष विवेक सुभेकर, खजिनदार जितेंद्र मेहता, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर, हरी देशमुख, लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष अभिजित पाटील, अश्विनी टिचर्स क्लासेसच्या संचालिका अश्विनी मेहता, अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष समीर मालोदे आदि मान्यवर या वेळी उपस्थित होते.

इयत्ता दहावीमध्ये प्रथम आलेल्या पीएनपी शाळेतील निरज मिसाळ (मराठी माध्यम), सिया अग्रवाल (इंग्रजी माध्यम), आयईएस वरसोली शाळेतील सईद सिद्दीकी, भावर्थ घरत, नागांव हायस्कुलमधील प्रचिती राऊळ, खंडाळे हायस्कुलमधील भावेश माळी, सुएसो कुरूळ शाळेतील अफरिन सिद्दिकी, चोंढीच्या स. म. वडके विद्यालयाची दिव्या म्हात्रे, बामणगांव हायस्कुलमधील रिया शिपाई, रूतिका राऊत, रेवदंड्याच्या स. रा. तेंडुलकर विद्यालयची रिया शिवरकर, भाव्या जैन, जा. र. ह. कन्याशाळेतील वेदश्री वनारसे, अरूणकुमार वैद्य हायस्कुलमधील ओजस पाटील, दिव्या संपलेषा, बेलोशी हायस्कुलमधील वेदांती थळे, सुमित मालोदे, अनुज शिगवण, अथर्व म्हात्रे, अभिजित सावंत यांच्यासह अश्विनी टिचर्स क्लासेसमधील युग जैन, जिया जैन, जश नागडा, रिषभ जैन, मानस शहा यांचा या वेळी मान्यवरांच्या हस्ते मानपत्र, सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. तसेच कोरोना काळात उत्कृष्ठ काम केल्याबद्दल दिव्या खडपे, प्रज्ञा माळी आणि समिक्षा घरत यांना कोविडयोध्दा म्हणून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश पोरे यांनी केले. अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनचे सचिव अमोल नाईक यांनी आभार मानले. अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष तुषार थळे, सचिव अमोल नाईक, खजिनदार राकेश दर्पे, कार्याध्यक्ष सचिन म्हात्रे, ज्येष्ठ छायाचित्रकार सुरेश खडपे, विवेक पाटील, सुबोध घरत, विकास पाटील, अतुल वर्तक, सुदेश माळी, संदेश कवळे, योगेश सावंत यांच्यासह असोसिएशनचे सदस्य, विद्यार्थी व पालक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. जोमा शंकर गायकर, श्रीमती भागुबाई नामदेव म्हात्रे, श्रीमती द्वारकाबाई नामदेव माळी, कै. गठू शंकर गायकर मयतचे वारस श्रीमती जनाबाई गठू गायकर, श्री. बळीराम गठू गायकर** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्याकरिता सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**
**मौजे - केवाळे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| गट नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २८/अ | ०-३१-६०<br>पो.ख. ०-०२-८०<br>**एकूण ०-३३-४०** | ७.२५ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधित व्यक्ती, सरकारी/निमसरकारी/खाजगी संस्था यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र. २७४५६३०६

**पनवेल.**
**दि. २५/०६/२०२२.**

## शाळेत जाताना विद्यार्थ्यांची गैरसोय

# एनएडी ते उरण बससेवा सुरू करा

## पालकांची मागणी; बस आगाराला निवेदन

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

उरणमधील एन ए. डी. करंजा या शाळेतील उरण व उरणच्या आसपासच्या परिसरातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी एनएडी ते उरण बससेवा सुरू करा, अशी मागणी विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी एसटी आगाराला निवेदन दिले आहे.

उरण बस स्थानकातून सूटणाऱ्या एन. ए. डी–उरण या बसने शाळेत ये–जा करीत असतात, परंतु कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे व रोड दुरूस्तीच्या कामांसाठी ही एसटी बससेवा बंद करण्यात आली होती. त्यामुळे या बससेवेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. त्यांना खासगी वाहनांतून, जास्तीचे पैसे खर्च करून प्रवास करणे त्रासदायक होत होत



आहे. उरण ते एनएडी करंजा मार्ग ही बससेवा रस्ता दुरूस्तीच्या निमित्ताने तसेच कोरोनामुळे जवळपास ४ वर्षं या मार्गावर बससेवा बंदच आहे. या परिस्थितीचा फायदा खासगी वाहनांनी घेतला व वाजवीपेक्षा जास्त पैसे भरून शाळेतील विद्यार्थांना नाईलाजाने प्रवास करावा लागतोय. विद्यार्थ्यांसोबतच या बसने शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही ही बससेवा लाभदायक ठरत होती.

या संदर्भात विद्यार्थ्यांना शाळेत येण्याजाण्यासाठी सुलभ व्हावे यासाठी एसटी बससेवा सुरू करण्याबाबत शाळेच्या पालकांकडून एनएडी उरण बससेवा शाळेच्या वेळेत सुरू व्हावी. याकरीता उरण एसटी डेपोचे महाप्रबंधक सतिश मालचे यांच्याकडे पत्रकार तृप्ती भोईर यांच्या सहकार्याने लेखी निवेदन देण्यात आले. या वेळी रोशनी कांबळे, सिमा वाल्मिकी, रेखा जाधव, ज्योती पवार, शांती सरोज, रेश्मा कदम, मंगलदास कांबळे, मंदार आसरकर, विश्वकर्मा किशन, रमेश कातकरी, मनिषा घळवट, नुर शेख, रवि आरेकर, संगिता जाधव, राजु क्षत्रिय, रोशन पासवंत, सुभाष गुलख, विलास गायकवाड, संजय गायकवाड, कालिक शेख, मेघा जाधव, आम्रपाली गायकवाड आदी पालकवर्ग उपस्थित होते.

## पनवेलमध्ये रिक्षा प्रवासाचे ज्यादा भाडे; नागरिकांचा आरोप

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेल रेल्वे स्टेशनमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवाशांची वर्दळ असते. स्टेशनबाहेर काही रिक्षाचालकांकडून याचा फायदा घेऊन प्रवाशांकडून अवाढव्य भाडे वसुली केली जात असल्याचा आरोप प्रवासी करू लागले आहेत. याबाबत कारवाईची मागणी होत आहे.



(संग्रहित छायाचित्र)

सीएनजीवर चालणाऱ्या रिक्षाचालकांकडून दरवाढीचे कारण सांगून बेसुमार भाडेवाढ केली जात आहे. मीटरप्रमाणे न चालणाऱ्या रिक्षाचालकांकडून काही अंतराचे प्रवास गाठण्यासाठी प्रवासासाठी २५ ते ४० रूपये आकारले जात असल्यामुळे सर्वसामान्यांना पायी मार्गक्रमण केल्याशिवाय पर्याय नाही. २०२१ रोजी एमएमआरटीएने मुंबई महानगर क्षेत्राकरिता पहिल्या दीड किलोमिटरसाठी मिटरप्रमाणे २१ रूपये दर निश्चित केले आहेत. पनवेलमध्ये काही रिक्षाचालकांवर परिवहन विभागाचा अंकुश नसल्यामुळे रिक्षामिटरप्रमाणे चालत नाहीत. बहुतांशी रिक्षा सीएनजी वर कार्यरत असल्याने रिक्षाचालकांची पूर्वीपेक्षा जास्त इंधन बचत होत आहे. अशा परिस्थितीतदेखील काही रिक्षाचालक जादा भाडे आकारात असतात. पनवेल रेल्वे स्टेशनसह शहरातदेखील काही रिक्षाचालक असे प्रकार करीत आहेत.

मीटरप्रमाणे भाडे न आकारणाऱ्या रिक्षाचालकांची प्रवाशांनी तक्रार केल्यास आम्ही त्यांच्यावर कारवाई करतो. नोटीस बजावून दंडदेखील आकारतो. पनवेल वाहतूक शाखा अशा तक्रारी आमच्याकडे केल्यास आम्हाला अशा रिक्षा चालकापर्यंत पोहचणे सोपे होईल, असे वाहतूक पोलिसांचे म्हणणे आहे.

**भाववाढीचे कारण प्रवाशांकडून जादा भाडे आकारले जाते. मीटरप्रमाणे रिक्षा चालविण्याचा आग्रहदेखील या रिक्षाचालकांना करावा लागतो.**
**–शैलेश क्षीरसागर, प्रवासी**


**प्रवाशांच्या तक्रारीप्राप्त झाल्यावर रिक्षाचालकांवर कारवाई करण्यात येते. रिक्षाचालकांसोबत बैठका घेऊन त्यांना आम्ही प्रवासी भाडे, वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत सूचना करतो.**
**–संजय नाळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर वाहतुक शाखा**

## पनवेलमध्ये आगीत एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील आकुर्ली गाव येथील एका बंगल्याच्या बेडरूमला लागलेल्या आगीत दुर्दैवाने एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

ड्रीम हौस या बंगल्याच्या बेडरूमला



रविवारी (दि. २६) सकाळी अचानकपणे आग लागून राजा ठाकूर या व्यक्तीचा दुदैवी मृत्यू झाला आहे. या आगीची माहिती मिळताच पनवेल, नवीन पनवेल व कळंबोली परिसरातील अग्निशमन दलाची बंब घटनास्थळी रवाना होऊन त्यांनी आग आटोक्यात आणली आहे, परंतु आगीचे कारण अद्याप समजू शकले नाही.



**पनवेल : नेत्ररोगजज्ञ डॉ. सुहास हळदीपुरकर यांचा वाढदिवस हॅप्पी मॅन ग्रुपच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.**

## नवी मुंबईत इंडिया हॉटेलियर ॲण्ड हॉस्पिटॅलिटी अवॉर्ड

**नवी मुंबई : बातमीदार**

हॉटेल्स रिसॉर्ट्स आणि आदरातिथ्य देतात कंपन्या ज्या अतिथींना उत्तम प्रतीच्या सेवा आणि जागतिक दर्जाच्या सुविधा देतात. त्यांच्याकरिता नवी मुंबई चेंबर ऑफ बिझनेस ॲण्ड इंडस्ट्रीज ने शुक्रवारी फोर–पॉइंट शेरेटन, वाशी, नवी मुंबई येथे हॉटेल्सना त्यांचा गौरव म्हणून इंडिया हॉटेलियर अँड हॉस्पिटॅलिटी अवॉर्ड २०२२ पुरस्कार सोहळा आयोजित केला.



संघटनेचे अध्यक्ष डॉ. धीरेंद्र गौतम पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, २१व्या शतकात हॉटेल आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्राचे सक्षमीकरण आणि परिवर्तन कसे करता येईल त्याचबरोबर त्यांना अधिक स्पर्धात्मक व जागतिक दर्जाची सेवा प्रदान करण्यासाठी आणि त्यांच्या लाभार्थ्यांना उत्तम अनुभव देण्यासाठी व्यवसाय आणि कॉर्पोरेटमधील अनेक यशस्वी हॉटेलियर आणि हॉस्पिटॅलिटी लीडर्स हे उपस्थित होते. या क्षेत्रातील व पुरस्कार प्राप्त मान्यवरांनी आपले विचार सुद्धा व्यक्त केलेत.

एनएमसीबीआय च्या कोअर टीमचे सदस्य आणि कॉर्पोरेट रिलेशनचे संचालक राहुल बनसोडे यांनी सांगितले की, देशाच्या आर्थिक जडणघडणीमध्ये हॉटेल आणि आदरातिथ्य उद्योग महत्वपूर्ण असतो. या उद्योगांशी निगडित जे लोक आहे त्यांचा सन्मान क्वचितच होतो. त्यांना प्रोत्साहन देणे म्हणजे या व्यवसायाला चालना देण्यासारखे आहे. म्हणून एनएमसीबीआय या संस्थेच्या माध्यमातून हा पुरस्कार सोहळा आम्ही आयोजित केला होता.

या कार्यक्रमात हॉटेलियर आणि हॉस्पिटॅलिटी इंडस्ट्रीला भारत आणि जगभरात त्यांचा व्यवसाय व्यवस्थापित करण्यात आणि वाढविण्यात कशी मदत करू शकते. यावर मान्यवरांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमादरम्यान फॅशन शोच्या वेगवेगळ्या पारंपारिक व पाश्चिमात्य फॅशन वॉल्कने रंगत भरली.

## ‘युगप्रवर्तक राजा शाहू महाराज’

**नवी मुंबई : बातमीदार**

शिक्षण, कला, क्रीडा, उद्योग, पाणीपुरवठा, महिला सक्षमीकरण, अंधश्रध्दा निर्मुलन, आपत्ती व्यवस्थापन आणि महत्त्वाचे म्हणजे सामाजिक समता अशा विविध विषयांमध्ये अतिशय प्रभावी काम राजर्षि शाहू महाराजांनी केले आहे. त्यामुळे काळाच्या पुढचे पाहणारा हा युगप्रवर्तक राजा असल्याचे मत प्रसिध्द साहित्यिक तथा महाराष्ट्र शासनाच्या राजर्षि शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव डॉ. विजय चोरमारे यांनी व्यक्त केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीदिनांच्या पूर्वसंध्येला ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहात ‘विचारवेध’ व्याख्यान शृंखलेअंतर्गत ‘आधुनिक क्रांतीचे राजर्षि’ या विषयावर डॉ. चोरमारे यांनी राजर्षि छत्रपती शाहू महाराजांच्या जीवन चरित्रातील अनेक दाखले देत त्यांच्या सर्वस्पर्शी महनीय कार्याचे महत्व विषद केले. यावेळी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी त्यांचा सन्मान केला.



भविष्याचा वेध घेण्याची दूरदृष्टी शाहू महाराजांकडे असल्याने आजच्या काळातही ते समकालीन वाटतात असे कथन करीत डॉ. चोरमारे यांनी इंग्रजी राजवटीच्या प्रतिकूल काळात महाराजांनी इतके पुरोगामी निर्णय घेतले हे समजून घेतले तर त्यांचे महानपण अधिक मोठे असल्याचे जाणवते अशा शब्दात महाराजांचे महानपण मांडले.

महाराजांनी भेदाभेद न मानणारा कायदा केला. उपेक्षित घटकांना आरक्षण दिले, शिक्षणच माणसाच्या प्रगतीचा आधार आहे हे ओळखून शिक्षण सक्तीचे केले, जे पालक मुलांना शाळेत घालणार नाहीत त्यांना एक रूपया दंड लागू केला. सर्वांना एकत्र शिक्षण देऊन सामाजिक समतेचा पुरस्कार केला. उच्च शिक्षणापासून कोणी वंचित राहू नयेत म्हणून वसतिगृहे सुरू केली. उपेक्षित समाजघटकांना प्रवाहात आणण्यासाठी रोजगार उपलब्ध करून दिला अशा विविध बाबी त्यांनी अनेक उदाहरणे देत, महाराजांच्या विविध गोष्टी सांगत उलगडल्या.

राज्य उभे करण्यासाठी सांस्कृतिक जडणघडण महत्वाची असते हे मानणाऱ्या शाहू महाराजांनी सांस्कृतिक विकासावर भर दिला. सामाजिक सुधारणांची सुरूवात स्वत:पासून करून प्रसंगी कुटुंबीयांचा, समाजाचा विरोध स्विकारून समाजात कोणावरही अन्याय होणार नाही व अन्याय झाला असेल तर तो दूर करण्याची समानतावादी भूमिका घेतली हे विचारसूत्रच त्यांचे महानत्व दर्शविते, असे सांगत डॉ. चोरमारे यांनी तशा प्रकारची विविध उदाहरणे दिली.

सांस्कृतिकता ही माणसाचे माणूसपण वृध्दिंगत करणारी गोष्ट असून कोणत्याही शहराचे मोठेपण हे त्याच्या सांस्कृतिक वैभवावर अवलंबून असते, असे सांगत डॉ. चोरमारे यांनी नवी मुंबई महापालिका नियमितपणे विविध कार्यक्रम राबवित असल्याबद्दल आयुक्त अभिजित बांगर व सहकाऱ्यांचे कौतुक केले.

## सेवा सहयोग फाउंडेशनमार्फत दप्तर व शैक्षणिक साहित्याचे वाटप

**उरण : वार्ताहर**

सेवा सहयोग फाउंडेशनतर्फे शनिवारी (दि. २५) उरण मोरा येथील शाळेत गरीब गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ८० दप्तरे व शैक्षणिक साहित्य पेन्सिल, कंपास पेटी, वह्या, कलर बॉक्स, पाटी आधी साहित्याचे वाटप करण्यात आले.

सेवा सहयोग फाउंडेशनचे पदाधिकारी दीपा देवळे, विशाल देसाई, प्रज्ञा जाधव, अमृता शंभुस, आकाश गुप्ते, राम रोकडे, रमेश देवळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना मोफत दप्तराचे व शैक्षणिक साहित्य देण्यात आले.



या साहित्याचे वाटप करण्यासाठी सेवा सहयोग फाउंडेशन मार्फत असिस्टंट मॅनेजर सुषमा अवघडे, गट समन्वय लक्ष्मी माळी, सायन्स टीचर गोसावी प्राची यांच्या हस्ते दप्तरे व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सुषमा अवघडे यांनी आपल्या मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व सांगितले की, आम्ही दिलेल्या शैक्षणिक साहित्य व दप्तराचा योग्य वापर करून तुमची शैक्षणिक प्रगती वाढवी हीच आमची अपेक्षा, तसेच प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक साईनाथ गावंड यांनी आपल्या मनोगतातून म्हटले की, शैक्षणिक साहित्याचे वाटप केल्याने मुलांचे मनोबल वाढते, तसेच मुले शिक्षणापासून वंचित राहत नाहीत व शिक्षणाची जीवन ज्योत अखंड तेजोमय ठेवण्याचे काम सेवा सहयोग फाउंडेशनने केल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करत आहे.

या वेळी प्राथमिक शाळेचे चेअरमन चंद्रकांत कोळी, प्रभारी मुख्याध्यापक साईनाथ गावंड, सहाय्यक शिक्षक सुगिंद्र म्हात्रे, अनिल पाटील, सेवा सहयोग संस्थेचे पदाधिकारी सुषमा अवघडे, लक्ष्मी माळी, प्राची गोसावी, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर, विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्राथमिक शाळेचे सहाय्यक शिक्षक सुगिंद्र म्हात्रे यांनी करून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

## पावसाळ्यासाठी ताडपत्रींना मागणी; बाजारपेठेत खरेदी-विक्री सुरू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात सध्या मान्सूनचा लपंडाव सुरू झाला आहे. त्यामुळे पावसाळी कामांनाही सुरू झाली. त्यात प्रामुख्याने प्लास्टिकचा कागद, अस्तर, ताडपत्री यांना मोठी मागणी असते. स्थानिक बाजारपेठेत याची अनेक दुकाने थाटली असून महागाईचा फारसा परिणाम या व्यवसायावर झालेला नाही. त्यांची मागणी वाढली आहे.

पहिल्याच पावसाने अनेकांची घरे गळू लागली. शेती उपयोगी साहित्याचे नुकसान झाले. त्यामुळे अनेकांनी पाऊस संपताच बाजारपेठेत धाव घेऊन प्लास्टिक कागद आणि कापड खरेदीला सुरुवात केली आहे. आपला



माल सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच छतावर टाकण्यासाठी प्लास्टिक कागद व ताडपत्रीचा ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणामध्ये वापर केला जातो. दोन वर्षे कोरोना प्रादुर्भावाचा फटका या व्यवसायाला बसला. त्यामुळे साहजिकच मालाची विक्री अत्यल्प प्रमाणात झाली. आता पावसाचे वेध लागल्याने प्लास्टिक विक्रीला प्रतिसाद मिळत आहे. साधारणतः मेअखेरीस प्लास्टिक विक्रीला सुरुवात होते.

मान्सूनपूर्व पावसापूर्वी नागरिक प्लास्टिकचे कागद, कापड आणून छतावर टाकतात. पिकांना झाकण्यासाठी, धान्य– चारा झाकण्यासाठी देखील या कापडाचा वापर केला जातो. त्याची ही खरेदी जवळपास १५ ते २० दिवस अगोदर सुरू होते. पहिला पाऊसाचा जोर वाढल्यानंतर नागरिकांनीही प्लास्टिकचे कागद, कापड खरेदीला गर्दी केली आहे.

## पनवेलमधील बालग्राम आश्रमास अन्नदान

**पनवेल : वार्ताहर**

आपल्या वडिलांना पोलीस खात्यामध्ये बढती मिळून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावर नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल त्यांच्या कुटुंबीयांनी बालग्राम आश्रम येथे अन्नदान करून साजरा केला.



नवी मुंबई येथील पोलीस कार्यालयात कार्यरत असणारे पोलीस हवालदार सतीश हनुमंतराव शिदोरे यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती मिळाल्याने सहकारी व कुटूंबामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. वडिलांचे प्रमोशन झाल्याने त्यांचा मुलगा प्रदीप व महेश यांच्या हस्ते पनवेल येथील लहान मुलांच्या बालग्राम आश्रमास अन्नधान्य वाटप केले. या वेळी बालग्राम संस्थाचालक विनायक पाटील सह कुटूंबातील सदस्य उपस्थिती होते. त्यांचे या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## वशेणी येथे बारावीच्या मुलांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचे सदस्य आणि सेवाभावी व्यक्तीमत्व म्हणून परिसरात ओळख असणारे डॉ. शरद गणपत पाटील यांचे नुकतेच निधन झाले. त्याना श्रद्धांजली देण्यासाठी वशेणी इतिहास संपादकीय मंडळाने बारावीच्या गरजू मुलांना मोफत पाठ्यपुस्तक वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश भरत म्हात्रे, माजी पं. स. सदस्य लवेश म्हात्रे, वशेणी गावचे पोलीस पाटील दीपक पाटील, ग्रामपंचायत सदस्य संदेश गावंड, मूर्तीकार जगन्नाथ म्हात्रे, राहूल पाटील, बळीराम म्हात्रे, गणेश खोत, अनंत तांडेल, विश्वास पाटील, रघुनाथ पाटील, नितीन पाटील, पुरूषोत्तम पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविक मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी केले.



# सहा कोटींची व्हेल माशाची उलटी जप्त

## ■ एका महिलेसह सहा जणांना अटक ■ माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील कडापूर गावाच्या हद्दीत माणगाव पोलिसांनी शनिवारी (दि. २५) दुपारी सुमारे पाच कोटी ८० लाख रुपये किमतीची पाच किलो ८०० ग्राम वजनाची व्हेल माशाची उलटी हस्तगत केली असून, या प्रकरणी एका महिलेसह सहाजणांना सापळा रचून पकडले आहे.


(छाया : सलीम शेख)

रायगड-पाचाड मार्गावरील कडापूर गावाच्या हद्दीत शनिवारी दुपारी व्हेल माशाच्या उलटीची तस्करी होणार असल्याची खबर माणगावचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांना मिळाली होती. त्यानुसार रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, माणगाव उपविभागीय अधिकारी प्रवीण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजेंद्र पाटील यांच्या पोलीस पथकाने कडापूर गावाच्या हद्दीत पाळत ठेवली होती. शनिवारी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास एका झाडाखाली उभ्या असलेल्या पांढऱ्या रंगाच्या हुंडाई कार (एमएच-०२,सीएच-९७१७) जवळ एक इसम संशयास्पद स्थितीत त्याच्याकडे असलेली प्लास्टिकची गोणी लपवताना आढळून आला. त्याला पोलीस पथकातील मिलिंद खिरीट यांनी जागीच पकडले. त्याच्याकडील गोणीत व्हेल माशाच्या उलटीचा एक मोठा तुकडा आढळून आला. अधिक चौकशीत त्या इसमाने त्याचे नाव दिनेश उमाजी भोनकर (रा. सुरव तर्फे तळे, ता. माणगाव) व व्यवसाय चालक असल्याची माहिती दिली. तसेच त्याने तो व्हेल माशाच्या उलटीचा तुकडा दिनेश शेडगे (रा. महाड) याच्याकडून आणला असल्याचे सांगितले. या वेळी हुंडाई कारमध्ये असलेल्या वैभव बाबुराव कदम, योगिता वैभव कदम (दोघेही रा. नवीन पनवेल), दत्तात्रय मोहन शेट्ये (रा. गिरगाव मुंबई), सुरेश पंढरीनाथ नलगे (रा. ठाणे पश्चिम), सूर्यकांत वसंत पवार (रा. घणसोली, नवी मुंबई) यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून पाच किलो ८०० ग्राम वजनाची व्हेल माशाची उलटी आणि एक हुंडाई कार असा एकूण पाच कोटी ६२ लाख रुपयांचा मुद्देमाल माणगाव पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माणगावचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या पथकात सहाय्यक निरीक्षक नितीन मोहिते, लहांगे, उपनिरीक्षक गायकवाड, आघाव, सहाय्यक फौजदार जितेंद्र वाटवे, हवालदार प्रशांत पाटील, दर्शन दोड़कुळकर, रावसाहेब कोळेकर, पोलीस नाईक निवेदिता धनावडे, कुंजन जाधव, मिलिंद खिरीट, पोलीस शिपाई रामनाथ डोईफोडे, श्याम शिंदे, शिवाजी मिसाळ, गोविंद तलवारे, प्रवीण माटे, वनरक्षक अक्षय मोरे यांचा समावेश होता.

## शॉर्टसर्किटमुळे अलिबागमध्ये इमारतीत आग



**अलिबाग : प्रतिनिधी**

शहरातील ब्राम्हण आळीमधील दत्त मंदिराजवळील लक्ष्मीव्हीला इमारतीमधील एका निवासी सदनिकेमध्ये रविवारी (दि. २६) सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे आग लागली. या आगीत सदनिकेतील साहित्य जवळून खाक झाले. सुदैवाने घरी कोणी नसल्याने जीवितहानी टळली.

आगीचे वृत्त समजताच अलिबाग नगरपालिकेचे बंब आग विझविण्यासाठी घटनास्थळी दाखल झाले होते. तत्पुर्वी लक्ष्मीव्हीला सोसायटीमधील रहिवाशांनी पाण्याच्या सहाय्याने आगीवर नियंत्रण मिळविले होते. या आगीमुळे इमारतीच्या विद्युत केबलचे नुकसान झाले असून, महावितरणकडून केबल बदलण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे.

## पेण-खोपोली मार्गावर गुरांचा वावर

**पेण : प्रतिनिधी**

पेण-खोपोली मार्ग नव्याने काँक्रिटचा बनविण्यात येत आहे. या मार्गावरून वाहने सुसाट ये-जा करत असल्याने वारंवार छोटे-मोठे अपघात होत आहेत. या मार्गावर आता मोकाट गुरांचा मुक्तपणे वावर सुरू झाला आहे. त्यामुळे गंभीर अपघाताची शक्यता वाढली आहे.

**अपघात होण्याची दाट शक्यता**

पेण-खोपोली मार्गावर मोकाट गुरांचा वावर वाढला असून त्यांना वाचविण्याच्या प्रयत्नात चालकांचा वाहनांवरील ताबा सुटून अपघात होत आहेत तर काही वेळा वाहनांची ठोकर बसल्याने गुरे जखमी होण्याच्या तसेच गुरांचा जीव जात असल्याच्या घटना घडत आहेत. गुरांचे मालक आपली गुरे चरण्यासाठी पेण-खोपोली मार्गाजवळ मोकाट सोडत असल्याने गुरे रस्त्यावरून फिरणे, वाहनांच्या सामोर येणे, रस्त्यात ठिय्या मांडून बसणे असे प्रकार होत आहेत. मोकाट गुरांच्या वावरामुळे वाहनचालकांवर अपघातांची टांगती तलवार आहे.



## मुरूडमध्ये राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन


(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

येथील नगर परिषद कार्यालयात रविवारी (दि. २६) राजर्षी शाहू महाराजांची १४८ वी जयंती साजरी करण्यात आली. सकाळी नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक परेश कुंभार यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. परेश कुंभार यांनी या वेळी राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या लोकाभिमुख कामांची माहिती दिली.

सुट्टीचा दिवस असूनही या वेळी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्मिता मुरुडकर, जयेश चोडणेकर, उल्हास घराणे आदिंसह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या वेळी राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन केले.

## कर्जत मच्छीमार्केटमधील गटाराच्या उघड्या झाकणामुळे अपघाताची शक्यता

**कर्जत : बातमीदार**

शहरातील मच्छीमार्केट भागातील गटाराचे झाकण उघडे आहे. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असून कर्जत नगरपालिका प्रशासनाने त्याकडे लक्ष द्यावे, मागणी होत आहे.

कर्जत शहरातील मच्छीमार्केटच्या प्रवेशद्वारासमोरील गटाराच्या झाकणाची जाळी तुटली आहे. त्यामुळे मच्छीमार्केटमध्ये जाणाऱ्या नागरिकांचा पाय जाळीत अडकून अपघात होण्याची दाट शक्यता आहे. ही बाब मच्छीमार्केटमधील व्यापारी बिलाल अढाळ यांनी स्थानिक नगरसेवकाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यावेळी या नगरसेवकाने, नगर परिषदेचे अभियंता मनिष गायकवाड येऊन पाहणी करून दुरुस्ती करतील, असे आश्वासन दिले होते. मात्र दोन आठवडे होत आले तरीदेखील नगर परिषदेचे कुणीही संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी घटनास्थळी येऊन गटाराच्या तुटलेल्या झाकणाची पाहणी केली नाही किंवा ते दुरुस्तही केले नाही.


(छाया : संतोष पेरणे)

कर्जत नगर परिषदेच्या संबंधितांनी मच्छीमार्केटमधील गटारावर नवीन झाकण बसवावे, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.





## कुरूळ तलाव परिसरात स्वच्छता मोहीम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

माणुसकी प्रतिष्ठान, कुरूळ ग्रामपंचायत, रायगड जिल्हा परिषद, कुरूळ ग्रामस्थ, लायन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने कुरूळ (ता. अलिबाग) गावामधील तलाव परिसरातील प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला व तो पुनर्प्रक्रियेसाठी पाठवण्यात आला. तसेच तलावाच्या आजूबाजूला सुमारे शंभर सीडबॉलचे रोपण करण्यात आले.

माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान यांनी स्वच्छतेचे महत्त्व सांगून, लोक सहभागातून स्वच्छता, वृक्षारोपण आदि मोहिमा राबविण्याचे आवाहन केले.

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अमृत सरोवर अभियाना अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या तलाव स्वच्छता मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे समन्वयक जयवंत गायकवाड यांनी सांगितले.

कुरूळ सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, लायन्स क्लब सदस्य व 'माणुसकी' टीम सदस्य, रायगड जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे कर्मचारी या तलाव स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते. ग्रामसेवक श्री. खरात यांनी आभार मानले.


## पावसाळी पर्यटनासाठी खोपोली सज्ज

### परिसर पर्यटकांनी बहरणार

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाच्या आगमनानंतर खोपोली परिसरातील निसर्ग बहरण्यास सुरुवात झाली आहे. सह्याद्री पर्वताच्या हिरव्या चादरीबरोबरच पांढऱ्या शुभ्र पाण्याचे आकर्षक धबधबे सक्रीय होत आहेत. खंडाळा घाट परिसर हिरवाईने सजत आहे. दाट धुके व रिमझिम पाऊस हे खोपोली परिसराचे खास आकर्षण असून, याच निसर्गसौंदर्याचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांची पावले खोपोली व खंडाळा घाटाकडे वळत आहेत. सुट्टीचे दिवस व खास करून शनिवार, रविवारी या भागात हजारो पर्यटक पावसाळी पर्यटनाचा आंनद घेण्यासाठी येत आहेत.

खोपोली व खंडाळा घाटाच्या खऱ्या नैसर्गिक सौंदर्याचा अनुभव व आनंद घेण्यासाठी मान्सूनकाळ सर्वात्तम असतो. जून महिन्यापासून पुढील तीन महिने हजारो पर्यटक हा आनंद घेण्यासाठी खोपोली व खंडाळा घाट परिसरात दाखल होतात. आलेल्या पर्यटकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी येथील पोलीस प्रशासन, विविध सामाजिक संस्था व प्रशासनही सज्ज असते. या निमित्ताने खोपोली परिसरातील हॉटेल्स, धाबे, खाऊच्या टपऱ्या फुल होतात व त्यांना उत्तम आर्थिक कमाई होते.


(छाया : विनायक मांडपे)

**■ प्रमुख पर्यटन स्थळे**

झेनिथ धबधबा व परिसर, आडोशी तलाव व धबधबा, खंडाळा घाट व तेथील अनेक धबधबे



**■ खबरदारी व काळजी कोणती घ्यावी**

अतिवृष्टी काळात येथील पर्यटन जीवघेणे बनू शकते. त्यामुळे पावसाच्या पूर्व अंदाजाची माहिती घेऊनच या परिसरात पर्यटन करावे. अतिउत्साहीपणा नेहमीच दुर्घटनेला आमंत्रण देत असल्याने, त्यापासून लांब रहावे. माहिती नसलेल्या आडमार्गाच्या ठिकाणी जाण्याचे टाळावे, कोणतीही असुरक्षित किंवा आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यास स्थानिक पोलीस, आपत्कालीन मदतीला धावून येणाऱ्या सामाजिक संस्थाशी तातडीने संपर्क साधावा. यासाठी खोपोली पोलीस, खोपोली अग्निशमन दल, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते, यशवंती हायकर्स, सहज सेवा फाउंडेशन आदी सामाजिक संस्था कोणत्याही वेळी व प्रसंगी आपल्या मदतीला धावून येतील.

## पेण रामवाडी येथे नागाला जीवदान

**पेण : प्रतिनिधी**

रामवाडीतील आनंद नगर येथील रेल्वे मार्गाच्या बाजूला जाळ्यात अडकलेल्या नागाला सर्पमित्र विवेक घरत यांनी जीवनदान दिले.

रामवाडीमधील काही मुले फेरफटका मारायला रेल्वे मार्गाच्या बाजूला गेली होती. त्यापैकी अजय पाटील याला जाळ्यात नाग अडकलेला दिसला. त्याने पत्रकार विनायक पाटील यांना फोन करून सर्पमित्राला बोलवायला सांगितले. पाटील यांनी सर्पमित्र योगेंद्र वीरकर यांना हकीकत सांगितली. वीरकर यांनी सर्पमित्र विवेक घरत यांना घटनास्थळी पाठविले. नाग पूर्णपणे जाळ्यात अडकला असल्याने त्याला बाहेर काढण्यासाठी सर्पमित्र विवेकलाही कसरत करावी लागत होती. शेवटी नागाची जाळ्यातून सुटका करण्यात यश आले. या वेळी महेश पाटील यांनी सर्पमित्र विवेकला सहकार्य केले. या नागाला जवळच्या जंगलात सोडण्यात आले.


(छाया : अनिस मनियार)

## कृषी विद्यार्थिनींचे मोहोप्रे येथील शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**महाड : प्रतिनिधी**

ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत आचळोली येथील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी मोहोप्रे गावातील शेतकऱ्यांना माती परीक्षणाबाबत मार्गदर्शन केले.

दापोली येथील कोकण कृषी विद्यापिठाशी सलग्न असलेल्या आचळोली येथील कृषी महाविद्यालयाच्या ऋतुजा लोणकर, मायावती गेजगे, ऋती घाग, श्वेता जाधव, राशेका जमदाडे, साक्षी गडहिरे, प्रतीक्षा डोंगरदिवे, सुमेधा देवरुखकर या विद्यार्थिनींनी ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत मोहोप्रे गावातील शेतकऱ्यांना माती परीक्षण कसे व कधी करावे, माती परीक्षण करण्याचे फायदे काय, या बाबतीतले मार्गदर्शन केले. तसेच कोणत्या हंगामात कोणते पीक घ्यावे, जमिनीत नत्र, स्फुरद, पालाश, अन्नद्रव्ये, जमिनीचा सामू, क्षारांचे प्रमाण कसे राखावे याबाबत माहिती दिली. मोहोप्रे ग्रामपंचायतीच्या सरपंच ललिता म्हाके, धीरज पाटील यांच्यासह अनेक शेतकरी, ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.


(छाया : महेश शिंदे)

## रणजी ट्रॉफी अंतिम सामना

# मध्य प्रदेशाचा मुंबईवर शानदार विजय



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर मध्य प्रदेश आणि मुंबई यांच्यातील रणजी ट्रॉफीच्या अंतिम सामना खेळला गेला. रणजी ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात मध्य प्रदेशने ४१ वेळच्या चॅम्पियन मुंबईचा सहा गडी राखून पराभव करून पहिल्यांदाच विजेतेपद पटकावले.

शेवटच्या दिवशी मुंबईने मध्य प्रदेशसमोर विजयासाठी १०८ धावांचे लक्ष्य ठेवले होते, जे संघाने २९.५ षटकांत पूर्ण केले. मध्य प्रदेशच्या या विजयाचे नायक यश दुबे, शुभम शर्मा आणि रजत पाटीदार होते, ज्यांनी संघाला पहिल्या डावात शतकी आघाडी मिळवून दिली. या पदवीने मध्य प्रदेशने ६७ वर्षांचा दुष्काळ संपवला आहे.

मुंबईच्या पहिल्या डावात सर्फराज खानने शतकाच्या जोरावर ३७४ धावा केल्या. मध्य प्रदेशने पहिल्या डावात १६२ धावांची आघाडी घेत ५३६ धावा फलकावर लावत आणि त्याचवेळी सामन्यावर कब्जा केला. मध्य प्रदेशकडून यश दुबे, शुभम शर्मा आणि रजत पाटीदार यांनी शतके झळकावली. पहिल्या डावात पिछाडीवर पडल्याने मुंबईचा संघ तुटला होता. दुसऱ्या डावात वेगवान धावसंख्येच्या प्रयत्नात मुंबईचा संपूर्ण संघ २६९ धावांत गारद झाला. कुमार कार्तिकेयने ४ बळी घेत मुंबईचे कंबरडे मोडले. १०८ धावांचे लक्ष्य एमपीने ३०व्या षटकाच्या एका चेंडूवर सहज पार केले. यादरम्यान हिमांशुने ३७ तर शुभम आणि पाटीदारने ३०-३० धावा केल्या. पाटीदारने विजयी शॉट मारला आणि तो शेवटपर्यंत नाबाद राहिला.

रणजी ट्रॉफी २०२१-२२ च्या पहिल्या उपांत्य फेरीत मध्य प्रदेशने बंगाल संघाचा १७४ धावांनी पराभव केला. कर्नाटकविरुद्धच्या सामन्यात त्याने सुरुवात चांगली केली आणि पहिल्या डावातही आघाडी घेतली. असे असतानाही त्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता.

# भारतीय महिला संघाला विजयी आघाडी

## दुसऱ्या सामन्यात पाच गडी राखून मात; हरमनप्रीत, स्मृतीची चमक

**पीटीआय, डाम्बुला : वृत्तसंस्था**

कर्णधार हरमनप्रीत कौरची (नाबाद ३१ धावा व १ बळी) अष्टपैलू कामगिरी आणि सलामीवीर स्मृती मानधनाच्या (३४ चेंडूंत ३९ धावा) अप्रतिम फलंदाजीच्या बळावर भारतीय महिला संघाने शनिवारी दुसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात श्रीलंकेवर पाच गडी व पाच चेंडू राखून मात केली. यांसह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे.



डाम्बुला येथे झालेल्या या सामन्यात श्रीलंकेने दिलेले १२६ धावांचे आव्हान भारताने १९.१ षटकांत पूर्ण केले. स्मृती आणि शफाली वर्मा (१० चेंडूंत १७) यांनी भारताच्या डावाची आक्रमक सुरुवात केली. या दोघींनी ३.४ षटकांत ३० धावांची सलामी दिल्यावर शफालीला ओशादी रणसिंघेने माघारी धाडले. एस. मेघानाही (१० चेंडूंत १७) काही चांगले फटके मारून बाद झाली. यानंतर स्मृती आणि कर्णधार हरमनप्रीत यांनी तिसऱ्या गड्यासाठी ३८ धावांची भागिदारी रचली. स्मृतीने ३४ चेंडूंत आठ चौकारांसह ३९ धावा केल्यावर तिला इनोका रणवीराने बाद केले. मग हरमनप्रीतने डावाची सूत्रे आपल्या हातात घेतली आणि अखेरच्या षटकात भारताला जिंकवून दिला. यास्तिका भाटिया (१३) आणि दीप्ती शर्मा (नाबाद ५) यांनी तिला काहीशी साथ दिली. गेल्या लढतीतील सामनावीर जेमिमा रॉड्रिग्जला (३) फारशी चमक दाखवता आली नाही.

**संक्षिप्त धावफलक :**

श्रीलंका : २० षटकांत ७ बाद १२५ (विश्मी गुणरत्ने ४५, चमारी अटापट्टू ४३; दीप्ती शर्मा २/३४, हरमनप्रीत कौर १/१२) पराभूत वि. भारत : १९.१ षटकांत ५ बाद १२७ (स्मृती मानधना ३९, हरमनप्रीत कौरच्या नाबाद ३१; ओशादी रणसिंघे २/३२)

# मनमाडच्या शुभमने पटकावले सुवर्णपदक

**मनमाड : प्रतिनिधी**

कजाकिस्थान येथे झालेल्या एशियन चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धेत ४८ किलो वजनी गटात येथील सावरकर नगर जिमखान्याचा कुस्तीवीर शुभम आचपळे याने सुवर्णपदक पटकावत भारताचा तिरंगा डौलाने फडकावला. या विजयाबद्दल शुभमचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

कजाकिस्थान येथे सुरू असलेल्या एशियन चॅम्पियन कुस्ती स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मनमाड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर जिमखाना कुस्ती प्रशिक्षण केंद्राचा खेळाडू कुस्तीपटू शुभम हरी अचपळे याला मिळाली. शुभमने ४८ किलो वजनी गटात चमकदार कामगिरी करत सुवर्णपदकाला गवसणी घालत कजाकिस्थानमध्ये या एशियन चॅम्पियन कुस्ती स्पर्धेत भारताचा तिरंगा डौलाने फडकावला. शुभमला प्रशिक्षक, माजी नगराध्यक्ष साईनाथ गिडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

शुभम चांदवड तालुक्यातील शिंगवे येथील एका शेतकरी कुटूंबातील मुलगा आहे. सतत सराव, चिकाटी, मेहनतीच्या जोरावर यश मिळविल्याचा मनोदय गिडगे यांनी व्यक्त केला आहे.

# टीम इंडियाचे टेन्शन वाढले; कर्णधार रोहित शर्मा कोरोना पॉझिटिव्ह

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्ध १ जुलैपासून सुरू होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्यापूर्वी टीम इंडियासाठी वाईट बातमी आली आहे. सराव सामन्यादरम्यान कर्णधार रोहित शर्मा कोविड १९च्या रॅपिड अँटिजेन चाचणीत पॉझिटिव्ह आढळला आहे. कर्णधार रोहित शर्मा सध्या हॉटेलमध्ये आयसोलेशनमध्ये आहे. इंग्लंडविरुद्धच्या कसोटीपूर्वी रोहित फिट झाला नाही, तर टीम इंडियाला मोठा झटका बसू शकतो.



पहिल्यांदाच परदेशात कसोटीचे कर्णधारपद भूषवणारा रोहित या कसोटीतून बाहेर पडला, तर संघाचे नेतृत्व कोण करणार? हा सर्वात मोठा प्रश्न आहे. सलामीवीर केएल राहुलही दुखापतीमुळे कसोटी संघाबाहेर आहे, अन्यथा त्याच्याकडे कर्णधारपद दिले असते. दक्षिण आफ्रिका दौऱ्यात राहुल जखमी झाल्यानंतर पंतने भारतीय संघाची धुरा सांभाळली होती. इंग्लंडविरुद्धच्या एकमेव कसोटीसाठी केएल राहुलला उपकर्णधार बनवण्यात आले होते, पण कंबरेच्या दुखापतीमुळे तो केवळ या कसोटीतूनच नाही तर इंग्लंडविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या मालिकेतूनही बाहेर पडला आहे. अशा स्थितीत कर्णधार आणि उपकर्णधार या दोघांच्या अनुपस्थितीत टीम इंडियाचे नेतृत्व कोण करणार? असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे.

कसोटी मालिकेत विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने इंग्लंडवर २-१ अशी आघाडी घेतली. अशा परिस्थितीत विराट कोहली हा कर्णधार होण्याचा एकमेव प्रबळ दावेदार आहे. कोहलीने अपूर्ण राहून त्याच्या नेतृत्वाखाली ही मालिका पूर्ण करावी, अशी संघाची इच्छा आहे.

## चेस ऑलिम्पियाड

# रशिया-युक्रेन लढाई भारतात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतात होणाऱ्या चेस ऑलिम्पियाडमध्ये रशिया आणि युक्रेन यांच्यात सामना पहायला मिळणार आहे. ही स्पर्धा फुटबॉल वर्ल्डकप, ऑलिम्पिक आणि वर्ल्ड अॅथलेटिक्स चॅम्पियनशिपनंतरची सर्वात मोठी स्पर्धा आहे. तमिळनाडूतील महाबलीपुरम शहरात ही स्पर्धा होणार आहे.


या चेस ऑलिम्पियाड १८० पेक्षा अधिक देशांचे प्रतिनिधी आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ फेडरेशनच्या प्रमुखांची निवड करणार आहेत. आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ फेडरेशन सध्याचे अध्यक्षपद हे रशियाचे माजी उपपंतप्रधान आरके डी वोरकोविच यांच्याकडे आहे. यंदाच्या निवडणुकीत तेच सध्या आघाडीवर आहेत.

त्यांच्या विरूद्ध युक्रेनचे ग्रँडमास्टर अँडी बॅरीशपोलेट्स उभे आहेत. त्यांनी मे महिन्याच्या शेवटी आपली उमेदवारी घोषित केली होती. अध्यक्षपदासाठी अजून दोन उमेदवारदेखील रिंगणात आहेत. बचर कॉआटली ते सध्या एफआयडीईचे उपाध्यक्ष आहेत आणि बेल्जियमचे इनालबेक चेरिपोव हेदेखील रिंगणात आहेत.

# विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेत अभिषेक-ज्योती जोडीला सुवर्ण

**पॅरिस : वृत्तसंस्था**

अभिषेक वर्मा आणि ज्योती सुरेखा वेन्नम या भारतीय जोडीने शनिवारी (दि. २५) विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्यातील कंपाऊंड प्रकाराच्या मिश्र सांघिक गटात सुवर्णपदक पटकावले. अभिषेक-ज्योती या आघाडीच्या जोडीने फ्रान्सच्या जिन बोल्च आणि ४८ वर्षीय ऑलिम्पिक पदकविजेती सोफी डोडमोंट या फ्रेंच जोडीला अंतिम लढतीत १५२-१४९ असे नमवले.



यांसह त्यांनी भारताला कंपाउंड मिश्र सांघिक गटातील पहिलेवहिले सुवर्णपदक मिळवून दिले. भारताची सर्वात यशस्वी कंपाऊंड जोडी असलेल्या अभिषेक आणि ज्योतीने गेल्या वर्षीच्या विश्वचषक स्पर्धेत रौप्यपदक कमावले होते.

त्यांनी यंदा सुवर्णपदक पटकावत भारताला या स्पर्धेतील एकूण दुसरे पदक मिळवून दिले आहे. दीपिका कुमारी, अंकिता भाकट आणि सिमरनजीत कौर या भारतीय त्रिकुटाने यापूर्वीच रीकर्व्ह सांघिक गटाची अंतिम फेरी गाठत आपले पदक निश्चित केले आहे.

# बुद्धीबळ निवड चाचणी स्पर्धेत सुयश मणचेकर, ज्ञानदा गुजराथी अजिंक्य

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा बुद्धीबळ संघटनेच्या मान्यतेने कर्जत तालुका बुद्धीबळ संघटनेतर्फे १७ वर्षांच्या आतील जिल्हास्तरीय बुद्धीबळ निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नागोठणे-रोहा येथील मुलांच्या गटात सुयश मणचेकर तर मुलींच्या गटात ज्ञानदा गुजराथी हिने अजिंक्यपद पटकावले. या वेळी चार स्पर्धकांची पुण्यामध्ये होणाऱ्या राज्यस्तरीय बुद्धीबळ स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. या खेळाडूंवर जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





कर्जत शहरातील हनुमान मंदिराच्या सभागृहामध्ये ही जिल्हास्तरीय बुद्धीबळ निवड चाचणी स्पर्धा उत्साहात झाली. तालुकाध्यक्ष संजीव ठाकरे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी सचिव अंकित जोशी, डॉ. प्रथमेश अळसुंदेकर उपस्थित होते. दोन्ही गटात अलिबाग, रोहा, पनवेल, उरण, कर्जत आदी तालुक्यातील एकूण ५० स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेत मुलींच्या गटात ज्ञानदा गुजराथी हिने प्रथम, द्वितीय विद्याभारती धर्मेंद्र कुमार, तृतीय क्रमांक अलमीरा शेख हिने मिळविला. विशेष म्हणजे हे सर्व यशस्वी स्पर्धक कर्जत तालुक्यातील आहेत. मुलांच्या गटात नागोठणे येथील सुयश मणचेकर प्रथम, द्वितीय अलिबागच्या हिमांशू डंगर आणि तृतीय क्रमांक अलिबागच्याच आरव खेदू याने मिळवला. मुख्य पंच म्हणून सागर वाघमारे तर पंच म्हणून चैतन्य मोहिते, आयुष अभाणी, सार्थक मिंडे आणि कपिल कोळंबकर यांनी काम पाहिले.

यशस्वी स्पर्धकांना एसएसईएस विद्यालयाच्या प्राचार्य शबनम साय्यद आणि संजीव ठाकरे यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी सय्यद यांनी सात वर्षा आतील मुलांची स्पर्धा सुद्धा आयोजित करावी, असे सूचित केले. अंकित जोशी, डॉ. प्रथमेश अळसुंदेकर आदी उपस्थित होते.

मुलांच्या गटातील सुयश मणचेकर, हिमांशू डंगर तर मुलींच्या गटातील ज्ञानदा गुजराथी आणि विद्याभारती धर्मेद्र कुमार यांची पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बुद्धीबळ स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या सर्व विजयी खेळाडूंचे संपूर्ण रायगड जिल्ह्यातून कौतुक होत आहे.

# यंगस्टर प्लेयरची उडवली खिल्ली, बचावासाठी कोहली मैदानात

**इंग्लंड : वृत्तसंस्था**

भारत आणि लीसेस्टरशायर यांच्यामध्ये सराव सामना खेळल्या जात आहे. या सामन्यादरम्यान चाहत्यांनी भारतीय खेळाडूशी गैरवर्तन केले. सामन्यादरम्यान चाहत्यांनी भारतीय खेळाडू कमलेश नागरकोटीची खिल्ली उडवली. हे सर्व पाहून भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीला राग आला.



ड्रेसिंग रूमच्या लॉनमध्ये उभा राहून चाहत्यांवर रागावला आणि म्हणाला तो तुमच्यासाठी इथे आलेला नाही. कमलेश नागरकोटी भारतीय कसोटी संघासोबत नेट गोलंदाज म्हणून इंग्लंड दौऱ्यावर गेला आहे. कोहली आणि चाहत्यांमध्ये झालेल्या भांडणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

कमलेश नागरकोटी बरोबर चाहत्यांना सेल्फी काढायचा होता, पण नागरकोटीने कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यावर चाहते विराटला म्हणतात, या सामन्यासाठी आम्ही सुटी घेतली आहे. अशा वेळेस खेळाडूंसोबत सेल्फी घेण्याचा अधिकार आहे. चाहत्यांकडून हे ऐकल्यानंतर कोहलीनेही त्यांना उत्तर दिले. तो तुमच्यासाठी इथे आला आहे का? तो येथे सामन्यासाठी आला आहे. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर बहुतांश लोक कोहलीचे समर्थन करीत आहेत.

# कसोटीत बेन स्टोक्सचा अनोखा विक्रम

**लीड्स : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्सने न्यूझीलंड विरूद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यात एक मोठा पराक्रम केला. तो कसोटी इतिहासातील १०० षटकार मारणारा तिसरा फलंदाज ठरला आहे. हेडिंग्ले येथे सुरू असलेल्या कसोटी सामन्यात त्याने टीम साऊदीला षटकार मारून आपले कसोटीतील षटकारांचे शतक पूर्ण केले.



१५१ कसोटी डाव खेळणारा बेन स्टोक्स आता सध्याचा इंग्लंडचा प्रशिक्षक ब्रँडन मॅक्युलम आणि अॅडम गिलख्रिस्ट यांच्या पंक्तीत जाऊन बसला आहे. या यादीत मॅक्युलम १०७ षटकार मारत अव्वल स्थानावर आहे, तर ९६ कसोटी सामन्यात १०० षटकार मारणारा गिलख्रिस्ट दुसऱ्या स्थानावर आहे. त्यानंतर आता बेन स्टोक्सचा नंबर लागतो. तसेच कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्यांच्या यादीत ख्रिस गेल (९८) चौथ्या तर जॅक कॅलिस (९७) पाचव्या स्थानावर आहेत.

न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू डॅरेल मिचेल आणि विकेटकिपर टॉम ब्लंडेल यांनीदेखील एक विक्रम केला. या दोघांनी एका कसोटी मालिकेत भागीदारीत सर्वाधिक धावा करण्याचा पराक्रम केला. त्यांनी आतापर्यंत ६११ धावा केल्या आहेत. न्यूझीलंडच्या मार्टिक क्रोव्ह आणि अँड्र्यू जॉनेस यांनी १९९१मध्ये श्रीलंकेविरूद्धच्या कसोटी मालिकेत भागीदारीत ५५२ धावा केल्या होत्या. हा विक्रम मिचेल आणि ब्लंडेल यांनी मोडला.




हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अ‍ॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अ‍ॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**